महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

हाकारा

➢ वर्ष : २६ वे

➢ अंक : दुसरा

एप्रिल-जून २००५

महिला स्वावलंबन आणि विकास

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

(द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस - मास)

मानव विज्ञान या संज्ञेमध्ये मानव, समाज, संस्कृति व पर्यावरणाशी असलेले नाते याविषयी सर्वांगीण दृष्टीने अभ्यास करणाऱ्या सर्व विद्याशाखांचा अंतर्भाव होतो. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची स्थापना १९७६ साली पुणे विद्यापीठात झाली. शासन, सामाजिक कार्यकर्ते व संशोधक यांना एका व्यासपीठावर आणून आदिवासी, ग्रामीण तसेच शहरी समाजातील लोकांच्या समस्या समजावून त्या सोडविण्यासाठी ज्ञान व अनुभवाचा उपयोग करणे हे परिषदेचे मुख्य ध्येय आहे. महाराष्ट्र राज्याचे पहिले आदिवासी सचिव - आयुक्त श्री. वसंत मंडलेकर हे संस्थेचे पहिले अध्यक्ष होत. त्यानंतर प्रा. गं. बा. सरदार, श्री जनार्दन वळवी, प्रा. पां. वा. सुखात्मे, प्रा. अ. रा. कुलकर्णी यांनी अध्यक्षपद भूषविले. आदिवासी भागात काम करणारे कार्यकर्ते तसेच आदिवासी साहित्यिक यांना महाराष्ट्रात प्रथमच परिषदेने एका व्यासपीठावर आणले.

केवळ आदिवासींच्या प्रश्नांना वाहिलेले हाकारा त्रैमासिक गेली २५ वर्षे परिषदेतर्फे प्रकाशित होत आहे. लोकांच्या समस्या त्यांच्या नजरेतून समजून, त्यांच्या सहभागातून एकात्मिक विकास साधण्याची परिषदेची वैचारिक बैठक आहे. आर्थिक विकास व समता हे परिषदेचे ब्रीद आहे. आदिवासी उत्थान कार्यक्रमाद्वारे आदिवासी समाजाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आदिवासी लोकांचे सबलीकरण करणे व त्या प्रक्रियेतून त्यांचा आत्मविश्वास, आत्मसन्मान व अस्मिता जागृत करणे हा परिषदेचा दृष्टिकोन आहे. त्याद्वारे बहुविध राष्ट्रीय सांस्कृतिक प्रवाहास आदिवासी संस्कृतिच्या योगदानाच्या निरंतर संधी प्राप्त होतील.

यापुढील काळामध्ये आर्थिक परिवर्तनाद्वारे सामाजिक क्षेत्रांचा विकास घडवून आणणाऱ्या सरकारी व स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने वाटचाल करण्याचा परिषदेचा मानस आहे. परिषदेची कार्यकक्षा अधिक विस्तृत व्हावी या हेतूने दोन केंद्रांची स्थापना केली आहे.

१. स्वास्थ्य व विकास संशोधन केंद्र

२. आदिवासी व ग्रामीण विकास केंद्र

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

- हाकारा वार्षिक सभासद १०० रुपये (व्यक्तींसाठी)
- हाकारा वार्षिक सभासद १५० रुपये (संस्थांसाठी)
- परिषद आजीव सभासद १००० रुपये (व्यक्तींसाठी)

परिषदेच्या आजीव सभासदांना हाकारा विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक/आजीव वर्गणी कृपया खालील पत्त्यावर महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनिऑर्डरने पाठवावी. मनिऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरु नये.

पत्रव्यवहाराचा पत्ता

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७.

आपल्या क्रियाशील सहकार्याबद्दल धन्यवाद

कष्टकरी जनता, भूषण भारता। वंदन करितो पददलिता॥

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

संपादक
रामचंद्र मुटाटकर

हाकारा (त्रैमासिक)

कार्यकारी संपादक
ग.शां. पंडित

वर्ष : सव्विसावे | एप्रिल - जून २००५ | अंक : दुसरा

अनुक्रमणिका

दोन शब्द २

पार्श्वभूमी ४

Preface and Summary 9

Conceptual Framework of the Project 12

प्रस्तावना १३

१. पर्यविक्षकंची मनोगते **१५**

१.१ प्रकाश चौधरी   १.२ नवनाथ जिते   १.३ बाळासाहेब भुजबळ

२. महिला सबलीकरण २७

२.१ पद्मा मासळकर   २.२ सुमन पवार   २.३ सुशिला सोनावणे

३. महिला स्वावलंबन **३८**

२.१ तपाबाई   २.२ बिल्कीस   २.३ सिंधू

४. संस्था-वृत्त **४५**

◆ **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे ४११ ००७.
टेलिफॅक्स (०२०)२५८९७२९८

अंक मूल्य ३० रूपये

◆ **विशेष सहाय्य**
सौ. मेधा रानडे

◆ **अक्षर जुळणी**
के.ई.एम.हॉस्पि.
संशोधन केंद्र
आरती परदेशी

◆ **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

◆ **मुद्रण स्थळ**
मोनार्क प्रिंट आर्टस, पुणे ३०.

◆ **मुखपृष्ठ मांडणी**
डॉ. हेमंत आपटे

या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

दोन शब्द...

डॉ. बानू कोयाजी यांच्या प्रथम स्मृतिदिनी हाकाराचा हा विशेष अंक वाचकांच्या हातात द्यायला आम्हाला आनंद होत आहे. डॉ. बानूबाई या महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या १९७८ सालापासून आजीव सभासद होत्या.

डिसेंबर १९७८ मध्ये आंतरराष्ट्रीय मानवशास्त्र (अॅन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस्) परिषद दिल्ली येथे भरणार होती. मुख्य परिषदेनंतर वैद्यक मानवशास्त्र (मेडिकल अॅन्थ्रॉपॉलॉजी) या विषयाचे चर्चासत्र पुणे विद्यापीठातील मानवशास्त्र विभागास देण्यात आले होते. भारतात वैद्यक मानवशास्त्राचा अभ्यास १९७४ सालापासून केवळ पुणे विद्यापीठातच होत होता. या चर्चासत्रात युरोप व उत्तर अमेरिका येथील ५२ मानवशास्त्रज्ञांनी आपली नावे नोंदविली होती. मी मानवशास्त्र विभागाचा पहिला विभाग प्रमुख व भारतात वैद्यक मानव शास्त्राचे अध्ययन सुरुवात करण्यास आघाडी घेतल्यामुळे पुणे येथील आर्म्ड फोर्सेस् मेडिकल कॉलेज व बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय येथे पदव्युत्तर विद्यार्थ्यांना शिकविण्याची संधी मिळाली. के. ई. एम्. हॉस्पिटल हे उत्तम उपचार केंद्र म्हणून प्रसिद्धीस आले होते. डॉ. बानू कोयाजी यांच्या चतुरस्त्र व्यक्तिमत्वामुळे बऱ्याच संस्था त्यांच्या पाठिंब्याने पुढे आल्या.

या पार्श्वभूमीवर मी डॉ. बानू कोयाजींना वैद्यक मानवशास्त्राच्या चर्चासत्रास पाठिंबा मिळविण्यासाठी भेटलो. त्यांनी भारतातील इतर लोकांच्या सहभागाबाबत चौकशी केली. आयुर्वेदाचे अध्वर्यू पंडित शिव शर्मा या चर्चासत्रास येणार होते व त्याकरिता त्यांनी वैयक्तिक देणगीही दिली होती. डॉ. बानूबाईंनी वैयक्तिक देणगी तर दिलीच व त्या परिषदेच्या आजीव सभासद झाल्या. त्याच बरोबर त्यांनी के. ई. एम् .ची एक गाडी ड्रायव्हर व पेट्रोलसकट आम्हाला वापरण्यास दिली. डॉ. जाल मेहता यांनीही त्यांच्या कुष्ठरोग संस्थेची गाडी आम्हास तीन दिवस वापरण्यास दिली. वैक फिल्ड कंपनीने सर्व प्रतिनिधींना पूना क्लब येथे भोजनास आमंत्रित केले. तसेच एक भोजन स्पायसर कॉलेजचे अध्यक्ष डॉ. चेरियन यांनीही दिले. डॉ. गोविंद खरे यांचे वैक फिल्ड कंपनीच्या हिरवळीवर इंग्रजीत कीर्तन झाले. या चर्चासत्रातील शोध निबंध आंतरराष्ट्रीय कीर्तीचे इंग्रजी नियतकालिक सोशल सायन्स ॲन्ड मेडिसीन यात विशेष अंक काढून प्रसिद्ध करण्यात आले. या चर्चासत्रामुळे पुणे विद्यापीठाच्या मानवशास्त्र विभागाच्या वैद्यक मानवशास्त्राचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध झाले. हे चर्चासत्र पुणे विद्यापीठ व महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद (महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस्) यांच्या संयुक्त विद्यमाने १९ ते २१ डिसेंबर १९७८ रोजी पुणे विद्यापीठातील शिवाजी व ज्ञानेश्वर सभागृहात भरले होते. या चर्चासत्राची आठवण आजही परदेशी शास्त्रज्ञांना होत असते.

डॉ. बानू कोयाजी यांच्या पाठिंब्यामुळे भारतात वैद्यक मानवशास्त्राचा पाया मजबूत झाला. त्यानंतर के. ई. एम्. हॉस्पिटल संशोधन केंद्राच्या वैज्ञानिक सल्लागार मंडळाचे (सायंटिफिक अॅडव्हायअरी बोर्ड) सभासदत्व मला बहाल करण्यात आले. के. ई. एम्. च्या ग्रामीण भागातील समाजशास्त्रीय संशोधनात माझा सहभाग नेहमी करण्यात आला तसेच सामाजिक विज्ञानातील संशोधनाच्या पद्धतीबाबत अनेकदा कार्यशाळा भरविण्यात आल्या. वढू व पाबळ येथील केंद्रांना मी डॉ. बानूबाईंबरोबर अनेकदा भेटी दिल्या.

पाबळचे महिला विकास केंद्र हे बानूबाईंचे आवडते केंद्र होते. भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषदेचे (इंडियन कॉन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च) सरसंचालक डॉ. पेंटल यांच्या सहकार्याने किशोरवयीन मुलींसाठी १९८८ साली प्रशिक्षण प्रकल्प सुरु करण्यात आला. पाबळ केंद्रासाठी आय.सी.एम.आर. ने के.ई.एम्. ला जमीन मिळवून दिली. किशोरवयीन मुलींच्या प्रकल्पाचे रुपांतर पुढे महिला आरोग्य व विकास कार्यक्रमात झाले. महिलांना संघटित करून, महिला मंडळांची स्थापना करून, त्यांना आरोग्य व व्यवसायाभिमुख प्रशिक्षण दिल्याने महिलांचा विकास होईल, म्हणजेच त्यांना आत्मसन्मान व आत्मविश्वास प्राप्त होईल हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमाची वाटचाल थोडक्यात हाकाराच्या या अंकात दिली आहे. या कार्यक्रमाचे शास्त्रीय मूल्यमापन करण्याची जबाबदारी माझ्यावर डॉ. बानू कोयाजी व डॉ. व्ही. एन. राव यांनी २००३ मध्ये सोपविली.

संख्यात्मक व गुणात्मक मूल्यमापनातून पाबळ भागातील पुरुषांच्या त्यांच्या बोलीतील प्रतिक्रिया बोलक्या आहेत. महिलांमध्ये १० वर्षात काय फरक झाला यावर ते म्हणाले **'महिलांचे दडपण गेले. त्यांची नजर साफ झाली. त्यांचे डोळे उघाड झाले.'**

पाबळ केंद्राच्या प्रमुख श्रीमती मेधा रानडे याही मानवशास्त्रातील माझ्या विद्यार्थीनी. त्यांनी गावातील स्त्रियांना कसा आत्मसन्मान व आत्मविश्वास मिळवून दिला याबद्दल या महिला त्यांच्या ऋणी आहेत. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या शब्दात सांगायचे असल्यास विकास कार्यक्रमात नवीन माणूस कसा घडतो याला जास्त महत्त्व आहे. भारतात सामुदायिक विकास योजना सुरु होताना नेहरूंनी विकास योजनातून किती विहिरी, रस्ते, शाळा, दवाखाने किंवा उत्पादन यांची वाढ झाली, यापेक्षा नवीन माणूस कसा घडला या उद्दिष्टावर भर दिला.

पाबळ केंद्रात गावपातळीवर समाजकार्य करणाऱ्या कार्यकर्त्या या इतर सामान्य स्त्रियांसारख्याच होत्या. किंबहुना त्यातील काही परित्यक्ता किंवा विधवा असल्यामुळे यांना समाजात हीन वागणूक मिळत असे. या स्त्रिया पाबळ केंद्रात शिकून गाव समाजात रचमात्मक कार्य करायला लागल्यावर त्यांना आता लोक मानाची वागणूक देतात. तसेच यांना मदत करणारे पाबळ केंद्रातील परिवेक्षक हे त्याच भागातील रहिवासी आहे. यांनी आपले अनुभव स्वत:च्या भाषेत लिहिले आहेत.

हाकाराच्या या अंकाचे वैशिष्ट्य म्हणजे गावातील सर्वसाधारण महिला कशा घडतात, स्वत:चा व समाजाचा कसा विकास घडवितात हे त्यांच्याच भाषेत सांगितले आहे. भारताचा विकास करायचा आणि तो कायम स्वरूपी टिकवायचा म्हणजे भारतातील मनुष्यबळाचा विशेषत: महिलांचा विकास करावयाचा, त्यांची अस्मिता जागृत करायची हा आहे. पाबळ केंद्रातील महिलांच्या विकासाची प्रेरणा ही डॉ. बानू कोयाजींची देणगी आहे, ते त्यांचे स्वप्न होते व त्यांची पूर्णत्वाकडे वाटचाल चालू आहे.

डॉ. बानू कोयाजी यांच्या स्मृतीस महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे व हाकाराचे श्रद्धापूर्वक अभिवादन.

प्रा. रा. के. मुटाटकर

पार्श्वभूमी

महिलांचे स्वावलंबन व विकास

महाराष्ट्रात १९ व्या व २० व्या शतकात समाजसुधारकांनी समाजपरिवर्तनाच्या चळवळी व प्रबोधन केले. त्यांत अस्पृश्यता निवारण, जातीसंस्थेचे उच्चाटन व स्त्रीमुक्ती या तीन विषयांचा प्रामुख्याने उल्लेख करण्यासारखा आहे. याचा पाया बऱ्याच अंशी संतवाङमयात सापडतो. २० व्या शतकातील मराठी साहित्यात स्त्री मुक्तीबाबत कथा, कादंबऱ्या व नाटकांत बरीच चर्चा झालेली आहे.

या सर्वांच्या परिणामस्वरूप स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतर स्त्रीमुक्तीच्या संदर्भात लग्नाचे वय, हुंडा, द्विभार्या प्रतिबंधक कायदा, घटस्फोट व पोटगी इत्यादी कायदे करण्यात आले. लोकशाहीत राज्यकारभारात स्त्रियांचा सहभाग वाढावा म्हणून अलिकडे पंचायत राज व्यवस्थेत स्त्रियांना एक तृतीयांश जागांचे आरक्षण देण्यात आले. तरी अजून राज्य विधानसभा व संसदेत आरक्षणाचे प्रस्ताव पडून आहेत. त्यावर निर्णय होत नाही. महात्मा गांधी-विनोबांसारख्या समाजसुधारक, स्वातंत्र्यसेनानी पुढाऱ्यांनी स्त्री मुक्ती, नारी शक्तीचा पुरस्कार केलेला आहे.

पितृप्रधान, पितृसत्ताक समाजात अजूनही स्त्रियांना गौण स्थान आहे. ग्रामीण भागात, जातीनिष्ठ भारतीय समाजात, स्त्रियांना 'टाकून देण्याचे' प्रकार बरेच आहेत. या विभक्त स्त्रियांना आर्थिक व सामाजिक अडचणींना तोंड द्यावे लागते. अजून मुलींचे विवाहाचे वय व त्याच्याशी निगडित शिकण्याचे प्रमाण हे अल्प आहे. त्याचा परिणाम लोकसंख्या वाढीवर व स्त्री आणि बालकांच्या आरोग्यावर होतो.

अगदी अलीकडे स्त्रियांचे बचतगट स्थापन झाले आहेत. त्यामुळे थोडेफार आर्थिक स्वावलंबन होते. निर्णय शक्ती, निर्णय प्रक्रिया व आत्मविश्वास, आत्मसन्मान वाढीस लागतो. वैवाहिक जीवनात, बचतगटामुळे स्त्रियांचा दर्जा उंचावला आहे. त्यांच्यामार्फत कर्ज मिळण्याची सोय झाल्याने, पुरूष स्त्रियांशी वार्तालाप, सल्लामसलत करावयास लागले आहेत ही जमेची बाजू आहे. समाजपरिवर्तनाची प्रक्रिया व गती मंद गतीने चालते. तरी समानतेकडे वाटचाल होत राहिली तर परिवर्तनाची गती वाढीस लागेल.

पुण्याच्या के. ई. एम्. हॉस्पिटल संशोधन केंद्रामार्फत शिरूर तालुक्यात पाबळ येथे महिला आरोग्य व विकास केंद्र दहा वर्षांपासून कार्यरत आहे. पाबळच्या आसपास साधारण ८५,००० लोकसंख्या असणाऱ्या ३० गावांतील महिलांचे प्रशिक्षण व विकास हे उद्दिष्ट ठेवून हे केंद्र चालविण्यात येते. एका हॉस्पिटलने केवळ आरोग्य व रोग निदान आणि उपचार याच्या पलीकडे जाऊन विकासाच्या कामात पुढाकार घेण्याचे कारण काय?

भारतात लोकसंख्या वाढ, माता-बाल मृत्यूचे प्रमाण, त्यांचे आरोग्य हे भेडसावणारे प्रश्न आहेत. शासनाने व स्वयंसेवी संस्थांनी माता-बाल आरोग्याबाबत बऱ्याच योजना सुरू केल्या व त्या ग्रामविकास आणि आरोग्य खात्याशी निगडित केल्या.

कमी वयात स्त्रियांनी लग्ने होत असल्याने लहान वयात माता होणाऱ्या किशोरवयीन मुलींसाठी शासनामार्फत काहीही कार्यक्रम चालविण्यात येत नाही. मातृत्वाची तयारी, आर्थिक स्वावलंबनासाठी शिक्षण, आत्मविश्वास वाढवणे या किशोरवयीन मुलींच्या गरजा आहेत. याबाबतीत डॉ. बानू कोयाजी व इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च यांच्या चर्चेतून १९८८ साली किशोरवयीन स्त्रिया-मुलींच्या आरोग्य व विकासाबाबत एक प्रायोगिक स्वरूपाचा संशोधन प्रकल्प घेण्यात आला.

पाबळ भागातील साधारण ३०,००० लोकसंख्या असलेल्या १८ गावातील ७ ते १९ वयोगटातील किशोरवयीन स्त्रिया-मुलींना आरोग्य, सकस आहार व कुटुंब जीवन याबाबत प्रशिक्षण असा या संशोधन प्रकल्पाचा केंद्रबिंदू होता. या प्रकल्पाचे १९९३-९४ साली मूल्यमापन करण्यात आले. किशोरवयीन स्त्रीया-मुलींच्या आरोग्य व प्रजननविषयक ज्ञानात लक्षणीय वाढ झाली व त्यामुळे गावातील लोकांच्या त्यांच्याकडे बघण्याच्या दृष्टिकोनात बदल झाल्याचा निष्कर्ष निघाला. मासिक पाळी व तत्सम स्त्रियांच्या आरोग्यविषयक प्रश्नांची चर्चा करण्याची प्रवृत्ती वाढीस लागली व त्याबद्दलची भीती आणि संकोच कमी झाले.

या अनुभवातून महिला आरोग्य आणि विकास प्रकल्पाची सुरुवात १९९३-९४ साली झाली. महिलांचा सामाजिक दर्जा उंचावणे, त्यांचा आत्मविश्वास व आत्मसन्मान वाढविणे ही प्रकल्पाची मुख्य ध्येय ठरविण्यात आली. त्याकरिता महिलांना प्रशिक्षण देणे, त्यांना महिला मंडळ व बचत गटांत संघटित करणे आणि उत्पन्नाचे साधन असणारे व्यावसायिक शिक्षण देणे असे कार्यक्रम योजण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अंतर्गत आरोग्य, सामाजिक संघटन, शिक्षण, आर्थिक स्वावलंबन व समाजाचे मतपरिवर्तन, विशेषत: पुरूषांचे मतपरिवर्तन याबाबत योजना आखण्यात आल्या. यात सामान्य रोगनिदान व उपचार, सकस आहार, महिला मंडळ, बचतगट, महिलांबाबत शासकीय योजनांचा उपयोग, साक्षरता, तरूण मंडळ, पुरूषांसाठी शिबीर इ. कार्यक्रमांची आखणी झाली. त्यामुळे महिलांच्या ज्ञानात भर पडून त्यांचा आत्मसन्मान व आत्मविश्वास वाढेल असे गृहित तत्त्व धरण्यात आले. एकंदरीत महिलांचे सबलीकरण करणे हा पाबळ केंद्राचा मुख्य उद्देश होता किंवा आहे.

हा कार्यक्रम चालविण्यासाठी मनुष्यबळ किंवा मानवी साधन-संपत्ती कशी वापरायची याची आखणी झाली. त्याप्रमाणे प्रकल्पप्रमुख म्हणून मानवशास्त्र (ॲन्थ्रॉपॉलॉजी) पदवीप्राप्त महिलेची निवड करण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करण्यासाठी प्रभाग पर्यवेक्षक व क्षेत्र पर्यवेक्षक नेमण्यात आले. हे सर्व शिरूर-पाबळ परिसरातील रहिवासी आहेत. गावपातळीवर लोकांशी सल्लामसलत करून गावातील महिला सामाजिक कार्यकर्त्या म्हणून निवडल्या. या १५ महिला ५ वी ते १२ वी शिकलेल्या, साधारण २० ते ४० वर्षे वयाच्या, विवाहित परित्यक्त्या अशा होत्या. प्रत्येक कार्यकर्तीने साधारण ५००० लोकसंख्या असलेल्या गाव-वस्त्या असा कार्यभार सांभाळाला होता.

या समाज कार्यकर्त्या महिलांना सर्वसाधारण खालील जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या.

१) माता-बाल आरोग्य, आहार, कुटुंब कल्याण व नियोजन

२) प्राथमिक स्वरूपाचे उपचार करणे व गरजूंना प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रूग्णालयात नेणें.

३) पाबळ केंद्रात प्रशिक्षणाच्या कार्यक्रमांना स्त्रिया व किशोरवयीन मुलींना सहभाग करण्यास प्रोत्साहन देणे.

४) महिला मंडळ, बचत गटांची स्थापना करण्यास मदत करणे.

५) पोस्टाच्या बचत योजना, महिला समृद्धी योजना व इतर शासकीय योजनांची माहिती व त्यांचा लाभ घेण्यास मदत करणे.

६) परसबाग व फळझाडे लावण्यास मार्गदर्शन करणे.

पर्यवेक्षक व प्रकल्प प्रमुखांनी खालील जबाबदाऱ्या स्वीकारल्या :

१) महिला कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण

२) महिला मंडळ, बचत गट इ. बैठकांना हजर राहून मार्गदर्शन करणे

३) महिलांना बँकेमार्फत कर्जपुरवठा इ. बाबतीत मदत करणे.

४) उत्पन्नवाढीचे कार्यक्रम आखणे.

५) गावपातळीवरच्या सर्व कार्यक्रमात सहभागी होणे.

६) ग्रामपंचायतीशी संपर्क ठेवणे व समन्वय साधणे.

७) विकासयोजनांची माहिती घेऊन ती लोकांपर्यंत पोहोचवणे.

८) पाबळ केंद्रात प्रशिक्षण करणे.

९) बचतगटाचे हिशेब व सभांचे रेकॉर्ड ठेवणे.

१०) शासकीय विभाग, अधिकारी, बँकेचे अधिकारी यांच्याशी संपर्क ठेवणे.

११) सामाजिक कार्यकर्त्या महिलांच्या व्यक्तिगत विकासात लक्ष देणे.

१२) कामाची आखणी, अहवाल इ.

महिला विकास प्रकल्पांतर्गत बरेच कार्यक्रम गेल्या १० वर्षात घेण्यात आले. त्यात काही कायम स्वरूपी तर काही तात्पुरत्या स्वरूपाचे होते. काही कार्यक्रम शासकीय योजनांतर्गत होते, तर काहींना इतर संस्थांनी व बँकांनी मदत दिली. कायमस्वरूपी कार्यक्रमात प्रामुख्याने किशोरवयीन मुली व तरूण महिलांना आरोग्य कुटुंब जीवन शिक्षणाचे प्रशिक्षण व प्राथमिक उपचाराची सोय असे कार्यक्रम आहेत. तसेच शिवणकाम, परसबागेबाबत प्रशिक्षण, पोस्टाच्या बचत योजना, महिलामंडळ, बचतगटाबाबत प्रशिक्षण, दिवाळीसाठी पणत्या मेणबत्या, मेहंदी, रांगोळी इ. वस्तू बनविणे किंवा कलाकुसरी इ. योजना कायमस्वरूपी चालू आहेत. कायमस्वरूपी न चालणाऱ्या कार्यक्रमात सकस आहाराची प्रात्यक्षिक शिबिरे, गांडुळखताबाबत प्रशिक्षण, सुधारित चुली, प्रौढ प्रशिक्षण, बालवाडी, भरतकाम, स्वेटर विणकाम, चामड्याच्या पिशव्या, तरूण मंडळांना मार्गदर्शन, प्रशिक्षण इ. चा अंतर्भाव होतो.

१९९४ साली प्रथम महिला मंडळांची स्थापना झाली. ३० गावात ४२ महिला मंडळांची नोंदणी झाली. स्त्रियांनी एकत्र येऊन काम करण्याची ही पहिलीच वेळ. महिला मंडळांना शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. वर्ष दोन वर्षांनी महिला मंडळांनी बचत गट स्थापन केले. १९९५-९६ साली १२ बचतगटांपासून सुरुवात होऊन २००२-२००३ मधे साधारण १०० बचत गट स्थापन झाले. १८ गावांत बचतगटांची सदस्य संख्या १७०० च्या घरात गेली. साधारण बचत गटांतून उचल घेणाऱ्यांत ५०% टक्के महिला अशिक्षित आहेत व त्यांच्यात दोन वेळा किंवा पाच वेळा उचल

घेण्याचे प्रमाण बरेच आहे. उचल घेणाऱ्यात इतर मागास वर्ग व अनुसूचित जातीच्या मिळून महिलांचे प्रमाण उच्च जातीच्या महिलांएवढेच आहे. तसेच या महिलांनी १००० रू. पेक्षा जास्त उचल बचत गटातून घेतली व परत केली. उचल घेण्याच्या कारणात प्रामुख्याने घरगुती खर्च, औषधोपचार, मुलांचे शिक्षण, खते, बी-बियाणे इ. ची उतरंड सापडते.

बचत गटांना कॅनरा व सिंडिकेट बँकांनी मदत केली. त्याचा विनियोग स्त्रियांनी शेळ्या, गाय व शिवण मशीन घेण्यासाठी केला. या सगळ्या कर्जाची १००% परत फेड झालेली आहे. पाबळ केंद्रात चालणाऱ्या प्रशिक्षण वर्गात शेळीपालन बाबत प्रशिक्षणास सर्वात जास्त प्रतिसाद मिळतो.

पाबळ केंद्रातील आरोग्य माहिती शिबीरांना चांगला प्रतिसाद आहे. अशी माहिती बचतगटातही देण्यात येते. बाळंतपणातील काळजी, आहार, मासिक पाळीत स्वच्छतेचे महत्त्व इ. बाबतीत स्त्रियांना चांगली माहिती आढळून आली. तसेच नवजात बालकाला लगेच आईंचे दूध पाजण्याबाबत जागरूकता आढळली.

महिला विकास कार्यक्रमाचा लोकांच्या आचार-विचारावर काय परिणाम झाला याचे मूल्यमापण २००४ साली करण्यात झाले. त्यात स्त्रियांनी खालीलप्रमाणे प्रतिसाद दिला.

'पूर्वी आम्ही रोज आंघोळ करीत नव्हतो. आता रोज आंघोळ करतो. मुलांचे कपडे दिवसातून दोनदा बदलतो. साबणाचा वापर कपडे धुण्यासाठी व संडासचे हात धुण्यासाठी करतो. पाण्याच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देतो. पाण्यास झाकून ठेवतो, त्यात औषधाची थेंब टाकतो. सकस आहाराचे महत्त्व कळले. तसेच शिजविलेल्या अन्नाची स्वच्छता पाळतो. हिरव्या पालेभाज्यांचे आहारात प्रमाण वाढले आहे. मासिक पाळीच्या वेळेस स्वच्छता पाळतो. कपडे उन्हात वाळवतो. जास्त तक्रार असल्यास वैद्यकीय सल्ला घेतो. आम्हाला आता मासिक पाळी व गर्भधारणा यांचा कार्यकारणभाव कळला आहे. त्याचा आम्ही उपयोग करतो म्हणजे गर्भधारणा होते. तसेच दोन मुलांत अंतर, गर्भाच्या वजनासाठी व आरोग्यासाठी सकस आहाराचे महत्त्व पटले आहे. या सर्व बाबतीत, आम्हा स्त्रियांत बरीच चर्चा होते. आम्हाला पाबळच्या शिबिरात एच. आय. व्ही. व एडसबद्दल माहिती मिळाली म्हणून आम्ही आमच्या सुना-मुलींना पाबळला शिबिरात पाठवतो.'

पर्यवेक्षकांच्या मते महिला विकास प्रकल्पाचा मुख्य उद्देश महिलांचा आत्मविश्वास वाढविणे, त्यांना संघटित करून त्यांची निर्णय शक्ती व क्षमता वाढविणे हा आहे. महिलांना चूल आणि मूल या पारंपरिक भूमिकांतून बाहेर काढून त्यांच्याकरिता नवीन भूमिकांचा विकास करणे हे प्रकल्पाचे लक्ष आहे. यासाठी, सुरुवातीच्या काळात महिला मंडळांच्या सभा वारंवार भरविण्यात येत, ज्यायोगे सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह महिलांना करता येई.

आर्थिक, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात बऱ्याच नवीन कार्यक्रमांना चालना मिळाली. नवीन शिक्षकांचे स्वागत करणे, सासूचा सार्वजनिक सत्कार करणे, नवीन सुनांचे स्वागत करणे अशा नवीन कार्यक्रमाद्वारे कालबाह्य रूढींना तडा गेला. बऱ्याच घटनांत महिला मंडळ व बचत गटाने हस्तक्षेप

केल्यामुळे काही स्त्रियांना नवऱ्याने टाकण्याचे प्रकारास आळा बसला. पर्यवेक्षकांच्या अनुभवातून असे कळते की सुरुवातीच्या काळात स्त्रियांच्या संघटितपणास पुरुषांचा विरोध होता व त्यांना आपल्याविरूद्ध भडकावले जात आहे. अशी भीती होती. त्यामुळे स्त्रियांच्या बैठकांना रेडिओ-टीव्ही आवाज मोठे करून किंवा खिडकीतून सारखे डोकावून बैठकींना बाधा आणण्याचे प्रयत्न झाले. परंतु आता पुरुषांची मनोवृत्ती बदलली आहे.

गावपातळीवरच्या सामाजिक कार्यकर्त्या यांच्या निवडीच्या संबंधात पर्यवेक्षकांनी त्यांचे वय, शिक्षण, कामाची निकड व उत्कट इच्छा तसेच त्या विधवा किंवा परित्यक्त्या असल्यास त्यांच्या कुटुंबाचा पाठिंबा इ. बाबींचा उल्लेख केला. कधीमधी या कार्यकर्त्या कनिष्ठ जातीच्या असल्यास त्यांना वरिष्ठ जातीच्या लोकांचा पाठिंबा मिळत नसे. पर्यवेक्षकांच्या मदतीची व पाठिंब्याची या स्त्रियांना लेखनकार्यात व गावपातळीवर गरज भासते. पर्यवेक्षकांनी ग्रामपंचायत व शासकीय अधिकाऱ्यांशी सलोख्याच्या संबंधावर जोर दिला. त्याद्वारे शासकीय योजनांचा लाभ स्त्रियांना घेता येतो.

सहा पर्यवेक्षक साधारण ३५ ते ५० वयोगटातील आहेत, त्यापैकी तीन समाजकार्य विषयाचे पदवीधर आहेत. इतर उच्च माध्यमिकपर्यंत शिकलेले आहेत. त्यांना के. ई. एम्. मधे १४ ते २० वर्षांचा कामाचा अनुभव आहे आणि महिला विकास प्रकल्पात ३ ते १० वर्षांचा अनुभव आहे. आता ते १०-१२ इतर स्वयंसेवी संस्थांना प्रशिक्षणात मदत करतात.

पाबळ केंद्राच्या गावपातळीवर कार्यकर्त्यांनी सांगितले की त्यांनी जेव्हा सामाजिक कार्य सुरु केले, तेव्हा त्या विधवा परित्यक्त्या असल्यामुळे लोक त्यांची चेष्टा करावयाचे. या बायका पुरुषांशी बोलतात, इकडे तिकडे भटकतात अशी कुचाळी करावयाचे. आता हेच पुरुष आम्हाला मानाने बोलवतात व स्वत:च्या बायकांना पाणी आणण्यास मदत करतात. या कार्यकर्त्यांनी पुरुषांच्या प्रशिक्षणासाठी वेगळी शिबिरं घ्यावीत असा सल्ला दिला. त्यांच्या मते, आता स्त्रिया जास्त मोकळया व धीट झाल्या आहेत. त्या बचतगटाच्या कामात हिरिरीने भाग घेतात व पैसे वेळेवर परत करतात. स्त्रीया स्वच्छता पाळतात व पिण्याचे पाणी गाळून घेतात.

लाभार्थी स्त्रियांना बचत गट खूपच आवडले आहेत. बचतगटाच्या माध्यमातून स्त्रिया एकत्र येतात व त्यांना आर्थिक संधि मिळतात असे त्या म्हणतात. त्यांनी बचतगट व बँकाच्या कर्जातून शेळ्या घेतल्या व आरोग्य, मुलांचे शिक्षण आणि रोपवाटिका तयार करण्यासाठी वापर केला. 'पूर्वी आम्हाला परवानगीशिवाय घराबाहेर जाता येत नव्हते. घराबाहेर जाणाऱ्या स्त्रियांना वाईट चालीच्या समजण्यात येत असे. पण आता आम्ही बाहेर जातो, शिबिरं, सभांना जातो व गावपातळीवर स्वच्छता, बालवाडी चालविणे, ग्रामसभेत भाग घेणे इ. कार्य करतो.' बऱ्याच महिलांनी त्यांच्या आत्मविश्वास, आत्मसन्मानाचे श्रेय महिला मंडळांना दिले. या महिला आता आपल्या सुना-लेकींना शिबिरास पाठवितात.

महिलांच्या विकासाबाबत पुरुषांशी संवाद झाला, पुरुषांच्या मते स्त्रियांचा खूप विकास झाला आहे. त्या आता कुटुंबाचा गाडा स्वत: चालवितात. त्यांना पुरुषांची मदत लागत नाही. तसेच त्या बचत

(पृष्ठ २६ वर)

PREFACE

The Constitution of India in its Directive Principals of State Policy has recognized the duty of the State to raise the level of nutrition and the standard of living and to improve public health. The health care facilities in India became an integral part of Community Development Programme in rural India. Population explosion became the prime agenda in development process. While married women were targeted for family planning activities and programmes were being devised to bring down infant and child mortality, the adolescent group of girls remained unattended. To fill the gap, ICMR and KEM Hospital Research Society teamed together in 1988 to initiate "The Young Women`s Health and Development Project" in 18 villages with 30000 population in Shirur taluka of Pune district.

This led to the evolution of Women's Health and Development Project around Pabal Centre encouraged by ICMR with a vision to establish a permanent training center for women. The idea was to take up activities to develop the self esteem and self confidence of women which would lead to their personality development and improve their health. The idea was to create a model for women's development which could be replicable and sustainable. The Pabal Centre started functioning since 1993.

There has been an excellent documentation of the activities undertaken by WHDP over the last 10 years. The coordinator and supervisory staff monitored the project with sincerity and commitment. It was found necessary to do external assessment of the project after 10 years.

Mrs Medha Ranade and her colleagues at Pabal have been committed to the vision of Dr. Banoo Coyaji about raising the self esteem of women. It is rarely that the community gives credit to the functionaries of an Institution for their self development. Their praise for Pabal Centre does not come from the medical facilities available at KEM, Pune or Vadu. It is rooted in their relationship with Pabal. KEMHRC has to be congratulated for being instrumental in developing the capacities of their Pabal staff who can deliver better goods if the opportunities are provided. We were delighted to interact with the Community Welfare Workers and with the women beneficiaries from the community who have come a long way in their march towards self development . The men were all praise for women that they could achieve capacities and freedom despite no support from them. We are thankful to them for their confessions

I have personally interacted with Dr. Banoo Coyaji ever since I approached her to solicit support to the international symposium on Medical Anthropology during Dec. 19-21, 1978 at Pune University, which was attended by more than 50 anthropologists from Europe and North America. This followed my induction in the Scientific Advisory Committee of KEM Hospital Research Centre and close association with community based research activities in the rural areas. I was requested to do the scientific assessment of Women Health and Development Project, Pabal in the year 2003 in my capacity as a student of anthropology and as one who was familiar with the vision of Dr. Banoo Coyaji. The impact assessment is quantitative in nature but the process assessment is qualitative, about human development of local women.

The present issue of Hakara (Clarion Call) is about women development in Pabal in their own words, and about the KEM Pabal staff and their perceptions.

SUMMARY

The Project

ICMR project in 1988 on preadolescent and adolescent girls, 7 to 19 years, on health,, nutrition and family life education resulted in better awareness and knowledge about health, disease and women's health issues. This led to the present project aiming at women's development and empowerment which means self development, self confidence and positive self image. Empowerment of women briefly refers to capacity to think independently and critically, develop confidence to offer opinions and take decisions, and experience economic independence.

This was sought to be achieved by planning interventions in the areas of Health, Society, Economic Betterment, Education and Community life. Intervention activities were to be initiated, organized and monitored by trained female community welfare workers, supervised by field supervisors and superintendent under the guidance of a senior social scientist.

Activities started with the formation of Mahila Mandals which became the rallying forum for all other activities. It needs to experience how difficult and arduous task it is to organize rural women while their men would suspect any non – traditional gathering of women. Vocational training like tailoring, kitchen garden, vermicomposting, and adult literacy were organized. This led to major breakthrough in forming SHGs, which promoted income generation activities and provided independence and support to the families. Women's status improved in the family and interspouse communication improved on terms of equality. This has provided self confidence, improved self esteem and self image of women. This is manifested in 'clear gaze' in the eyes, free interaction with males, participation in meetings and such other qualitative indicators. Men expressed women's empowerment that 'pressure lid is off women's minds'. They do not function under family or social pressure any more'. Women could make public statements that although deserted by their husbands, they were self reliant and managed their own affairs including the upbringing of their children. Knowledge of health is reflected in personal hygiene especially the menstrual hygiene.

Methodology of Assessment

Focused group discussions with the CWW, Supervisory staff, SHG members and Men from the beneficiary localities were conducted personally by Research Project Coordinator. The interview schedules of SHG members were administered by local girls and boys under the guidance of research staff. Training sessions for local investigators were conducted by the Research Coordinator.

Significant Findings

Of the surveyed 284 families, 15%are under BPL, 27% landless and 57% possessing less than 5 acres of land. Upper castes and OBC own more land and also pay more installment in SHG in the range of Rs. 50 – 100, against Rs. 25 – 30 by the SC. Majority of women took loans from SHG more than Rs 1000 for household needs, 42%, medical treatment, 39% children's education,26% and agricultural needs, 44%.. About 58% women took loans from banks for income generation activities, such as purchasing goats, sheep, cows and sewing machines. About 38% women had recurring deposits in the post office. About 23% women reported vocational training at Pabal in

goat rearing. Treatment care facilities are available in the public and private sector. About 43% families visited Vadu KEM mostly for pregnancy check up and delivery, and other gynecological problems. About 68% women reported services of CWW for minor illnesses. About 77% women had undergone tubectomy. 79% women had visited Pabal for attending workshops and meetings. Most women reported better menstrual hygiene practices, safe delivery practices and improved neonatal care. 21% women reported participation of their husbands in KEM programmes such as SHG and other meetings. Non- participation is attributed to lack of time. However, in men's FGD, the younger men desired activities for men and women and also expressed skill development training in agriculture for men.

Women expressed development in terms of economic betterment and gaining information and knowledge which they could share with others for their empowerment. This provides self confidence. Freedom of movement in the community, expressing opinions freely, interacting with men on terms of equality are other parameters of empowerment identified by them.

Sustainability

Change is the result of interventions, technological, social, educational and economic. Evolution is a slow process of change. In traditional agricultural communities, social changes were initiated by religious leaders and social leaders which were opposed in their lifetime. Women have unequal status in patriarchies, more so since wars and muscle strength. are still significant for capturing power. Saint poets and other leaders in Maharashtra promoted equality for women by supporting widow remarriage and women's education. For accelerating social and economic change, planned and directed change programmes have to be administered. Ideally, sustainability would refer to practices becoming a part of culture system and cultural values which could not be possible in one generation. Technologies and material aspects are absorbed faster due to visibility. Even that requires support from the authorities and markets.

Who will support women in their development and empowerment in a patriarchal society? Institutional support and peer solidarity are the key issues in this process. Democratic processes such as women's reservations in representative governments at all levels would offer favourable context for accelerating the process of self image and empowerment.

Strengths of KEM Pabal project

SHG built on the foundations of Mahila Mandals and the training and awareness campaigns by Pabal have already instilled self confidence among the beneficiary women. Diffusion is a slow process but the multiplier effect is faster than the initial efforts. The process of change has to pass through the stages of information, curiosity, skepticism, experimentation under support from those on whom one has confidence, leading to acceptance. This further leads to propagation through peer group interaction or through leadership initiatives.

The CWWs who have had lower image socially due to widowhood or deserted status are a role model of self confidence and empowered women having developed leadership qualities. This has been made possible by the support and training they received from the KEM functionaries at all levels including the Pabal supervisory group. Pabal group has gained experience, which is KEM's human resource asset. This asset can be productively used in training following the Jamkhed model.

Conceptual Framework of the Project



प्रस्तावना

महिला आरोग्य व विकास प्रकल्प

सौ. मेधा रानडे

के.ई.एम. हॉस्पिटल रिसर्च सेंटरच्या महिला आरोग्य व प्रशिक्षण केंद्राला पाच वर्षे पूर्ण झाली तेव्हा 'यशोगामिनी' ही पुस्तिका काढण्यात आली होती. या पुस्तिकेमध्ये प्रकल्पाच्या विविध उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील गरजू, गरीब महिलांच्या आयुष्यात कसा बदल घडून आला यासंबंधीची प्रातिनिधीक स्वरुपातील माहिती संकलित करण्यात आली होती. त्यामध्ये स्वावलंबन अल्पबचतगटाचे लाभार्थी, शासकीय/निमशासकीय योजनांचे लाभार्थी, व्यवसाय प्रशिक्षणाचे लाभार्थी व केंद्र नवीन सुरु झाले तेव्हा अस्तित्वात असलेल्या महिला मंडळाची वाटचाल याविषयीची माहिती होती.

लाभार्थी महिला त्यांच्या आयुष्यातील एका विशिष्ट टप्प्यावर असताना त्यांना केंद्राच्या उपक्र मांची साथ मिळाली आणि त्यामुळे त्यांच्या वैयक्तिक तसेच कौटुंबिक जीवनामध्ये सकारात्मक बदल घडून आला. हे सर्व बदल घडून येण्यासाठी महिलांनी स्वत: अथक परिश्रम घेतले. त्या परिश्रमांना योग्य ती दिशा देण्याचे काम केंद्राच्या कार्यकर्त्यांकडून झाले एवढेच.

हे केंद्र महिलांसाठी सुरु करताना ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी व अधिक आत्मविश्वासपूर्ण बनविणे, हेच प्रमुख उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले होते. ज्या महिला केंद्राच्या विविध उपक्र मांमध्ये सहभागी झाल्या त्यांच्या व्यक्तिमत्वात चांगल्या तऱ्हेने बदल होत गेलेला दिसला किंवा अनुभवता आला. या महिला निर्भयपणाने बोलू लागल्या, आपली मते मांडू लागल्या. कुटुंबामध्ये महत्वाचे निर्णय घेताना त्यांचे मत विचारात घेतले जाऊ लागले. त्यांचा स्वत:कडे बघण्याचा दृष्टिकोनही बदलला. अशिक्षित, अर्धशिक्षित, शिक्षित अशा सर्वच महिला व किशोरवयीन मुलींचे या केंद्राच्या विविध उपक्र मांच्या माध्यमांतून व्यक्तिमत्व घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि हेच या केंद्राचे मोठे योगदान आहे.

केंद्रामध्ये अनेक उपक्र म राबविण्याच्या एकूण प्रक्रियेत महिलांमध्ये बदल होत असताना खालील मुद्दे ठळकपणे जाणवले.

- बचतगटामध्ये सहभागी होऊन कुटुंबाला आर्थिक हातभार लावता आल्यामुळे कुटुंब व समाज यांचा या स्त्रियांकडे बघण्याच्या दृष्टीकोनात झालेला सकारात्मक बदल.
- विविध उपक्रमांव्दारे आरोग्यविषयक व इतर माहिती मिळाल्यामुळे त्यांचा स्वत:चा वाढलेला आत्मविश्वास.
- स्त्रियांनी सुरु केलेले शेतीला पूरक व्यवसाय व एकाच व्यवसायामध्ये गुंतून न राहता एकातून दुसरा, दुसऱ्यातून तिसरा व्यवसाय सुरु केल्यामुळे वाढत गेलेले फायदे/उत्पन्न
- महिला संघटनामुळे त्यांना मिळालेला भक्कम मानसिक आधार इ.

वरील सर्व उपक्र म अनेक कार्यकर्त्यांच्या सहकार्याने राबविण्यात आले. २००४ साली केंद्राला १० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने प्रकल्पामध्ये काम करणाऱ्या स्त्री पुरुष कार्यकर्त्यांची माहिती गोळा करण्यात आली. 'हाकाराच्या' या अंकात ती देत आहोत. याचा मुख्य हेतू असा आहे की ग्रामीण भागातील कमी शिकलेल्या व्यक्तींना योग्य ते प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळाले तर ते चांगल्या तऱ्हेने त्यांच्या

जबाबदाऱ्या पार पाडू शकतात. यामधील प्रत्येक जणाने/जणीने प्रकल्पातील विविध उपक्रमांमुळे स्वत:च्या जीवनात कसा बदल होत गेला ते लिहिले आहे. आपल्या आजूबाजूच्या महिला, भगिनींचा विकास घडवून आणत असताना ते स्वत: आपोआपच विकसित झाले आहेत.

प्रकल्पातील काही कार्यकर्त्या परित्यक्ता किंवा घटस्फोटीत आहेत. कामास सुरुवात करताना त्यांच्या मनामध्ये स्वत: बद्दल अत्यंत न्यूनत्वाची भावना होती. जगामध्ये आपल्या इतके दु:खी कोणी नाही असे वाटत होते परंतु त्या जसजशा लोकाभिमुख होत गेल्या, स्वत:च्या मनाची कवाडे उघडत गेल्या तसतशी त्यांना भोवतालच्या वास्तवाची जाणीव होऊ लागली. स्वत:चे दु:ख त्यापुढे फिके वाटू लागले. अगदी कमी शिकलेल्या, कोणताच आधार नसलेल्या स्त्रिया जगण्यासाठी कशी आणि कोणती धडपड करतात ते बघितल्यावर त्यांना स्वत:ला उभारी आली, आपण स्वत:चे जीवन सावरले पाहिजे, खंबीरपणाने उभे राहिले पाहिजे असे प्रकर्षाने वाटू लागले.

पुरुष कार्यकर्त्यांच्या व्यक्तीमत्वातही अनेक बदल होत गेले. तिघांपैकी एकाने तर स्वत:च्या आयुष्याविषयी सलगपणे काही लिहिण्याऐवजी प्रकल्पामधील नियम, काटेकोरपणा, शिस्त इ. वैशिष्टयांची त्याच्या स्वत:च्या दृष्टीकोनातून एक यादीच सादर केली आहे. त्यातून प्रकल्पाविषयीचे एक ठळक चित्र समोर उभे रहाते. तसेच प्रकल्पाच्या उपक्रमांच्या यशापयशाची कारणेही त्यामध्ये प्रतिबिंबीत झालेली दिसतात.

या सर्वच स्त्री–पुरुष कार्यकर्त्यांचे कथन तळागाळातील सामाजिक कार्यकर्त्यांना दिशादर्शक व मार्गदर्शक वाटेल असा विश्वास वाटतो. ●●

महिला आरोग्य व विकास 'माहिती पुस्तिका'

संपादिका : सौ. मेधा रानडे

या पुस्तिकेचे दोन भाग करण्यात आले आहेत. पहिल्या भागात आरोग्याविषयीची माहिती अत्यंत सोप्या भाषेत दिली आहे.

अगदी वैयक्तिक स्वच्छतेपासून - कान, नाक, डोळे यांची काळजी, परिसर स्वच्छता, रोग प्रसार कसा होतो, पोषण व आहार, वयात येणाऱ्या मुलांसाठी, गरोदर मातांसाठी, बाळांची काळजी, अतिसार, मलेरिया, क्षयरोग, कर्करोग, एड्स, कुष्ठरोग, मद्यपान, त्वचारोग एवढेच नाही तर बायोगॅस, सुधारित चूल, लोकसंख्या शिक्षण, अंधश्रध्दा स्वावलंबन गट इत्यादी सर्व विषयांना स्पर्श केला आहे.

दुसऱ्या भागात 'शेती' विषयातील गांडुळखत, परसबागेतील पालेभाज्या लागवड, किसान रोपवाटिका, औषधी वनस्पती, भेंडी लागवड, कांदा लागवड, झाडांचे महत्त्व अशा काही विषयांची थोडक्यात व महत्त्वाची माहिती दिली आहे.

या पुस्तिकेचा उपयोग प्रस्तावनेत लिहिल्याप्रमाणे ग्रामीण भागामध्ये आरोग्यविषयक जाणीवा वाढण्यास व शेतीतील काही सुधारित पद्धतींचा अवलंब करण्यास निश्चितच उपयोग होऊ शकेल यात शंका नाही.

सौ. मेधा रानडे यांनी पुस्तिकेचे संपादन नेमकेपणाने केल्यामुळे त्यांचे अभिनंदन.

ग. शां. पंडित

१ पर्यवेक्षकांचे मनोगत

के. ई.एम.हॉस्पिटल संशोधन विभागाच्या, महिला आरोग्य व विकास प्रशिक्षण केंद्रांतर्गत क्षेत्र-पर्यवेक्षक पदावर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे हे लिखाण. तिघांचेही शिक्षण जेमतेम ११ वी पर्यंतचे. परंतु त्यांचे काम पदवीधारक किंवा द्विपदवीधारक यांच्या तोडीचे आहे. प्रकल्पाकडून त्यांना दिल्या गेलेल्या जबाबदाऱ्या अशा होत्या :

- समाज कार्यकर्त्यांच्या कामावर देखरेख करणे व त्यांना वेळोवेळी योग्य ते मार्गदर्शन करणे, प्रकल्पांतर्गत आयोजित केल्या जाणाऱ्या प्रशिक्षण शिबिरामध्ये सहभागी होणे तसेच स्वत:च प्रशिक्षण देणे.
- बचतगट स्थापन करणे, त्यांच्या सभांना उपस्थित राहणे, नोंदी तपासणे, कर्ज घेण्यासंबंधी मार्गदर्शन करणे, बँकेचे कर्ज असल्यास त्याचे हप्ते गोळा करणे इ.
- गावपातळीवरील विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे, तसेच ग्रामपंचायत, प्राथमिक, माध्यमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, इतर संस्था यांच्याबरोबर समन्वय साधणे.
- त्यांना नेमून दिलेल्या भागामधील १८ वर्षांवरील मुले, पुरुष यांना प्रशिक्षणासाठी प्रवृत्त करणे. प्रकल्पाच्या उपक्रमांना पोषक अशा सर्वच कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे इ.

वरील विविध जबाबदाऱ्या पार पाडताना सुरुवातीला ते जरा बिचकत होते, आत्मविश्वास कमी होता, पण प्रौढ व्यक्ती म्हणून आवश्यक असलेली परिपक्वता त्यांच्यामध्ये होती. काम करण्याची आवड व जिद्द होती. त्यामुळेच ते एक प्रशिक्षक तसेच सुपरवायझर म्हणून स्वत:चा चांगला विकास करु शकले. त्यांच्या लिखाणातून व वेळोवेळी होणाऱ्या चर्चेतून खालील मुद्दे पुढे आले.

स्थानिक रहिवासी असल्यामुळे लोकांशी परिचय होता. तेथील संस्कृती, राहणीमान, रुढी, समजुती, अंतर्गत राजकारण इ. गोष्टी त्यांना आधीच माहीत होत्या. तो संदर्भ राखून लोकांशी आरोग्याबाबत चर्चा करणे त्यांना सोपे गेले. कुटुंबाबरोबर राहात असल्याने आर्थिक, शारीरिक, मानसिक, ओढाताण निश्चितपणे कमी होती. प्रशिक्षित कार्यकर्ते जेव्हा दुसऱ्या गावाहून येतात तेव्हा ही अडचण निश्चितपणे भासते. कितीही कष्ट पडले तरी यांनी मागे पुढे पाहिले नाही. विशेषत: सुरुवातीच्या काळात त्यांना रात्रीच्या वेळी होणाऱ्या कामासाठी सायकलवरुन ८–१० कि. मी . जाणे व तितकेच अंतर परत येणे असे नेहमीच करावे लागत असे; परंतु त्यांनी कधीही तक्रार केली नाही.

प्रकल्पासाठी पडतील ती कामे त्यांनी केली, कोणतेही काम हलके, कमी प्रतीचे आहे, असे त्यांनी मानले नाही. पाबळ प्रशिक्षण केंद्राची उभारणी करताना तर सर्वांनीच खूप मेहनत घेतली. त्यानंतर उपक्रमांची व्यवस्थित आखणी झाली व हळूहळू सर्वांच्याच जबाबदाऱ्यांमध्ये नियमितता आली. प्रकल्पामधील सर्वच

कार्यकर्त्यांना पहिल्यापासूनच कामाची शिस्त लावली गेली. मग ते वेळेचे काटेकोर पालन असो वा गावा–गावांमधील घटनांची माहिती वेळच्या वेळी देणे असो. अहवाल देणे वा कोणत्याही कार्यक्रमाचे नियोजन असो. त्यामुळे फिल्ड सुपरवायझर सुरुवातीपासून त्याच तालमीत तयार झाले. तिघेही जण वेळेच्या बाबतीत अतिशय दक्ष असतात. कार्यक्रमाचे नियोजन पुरेसे आधीच केलेले असते, त्यामुळे कोणाचाच वेळ वाया जात नाही.

कामाच्या नोंदींमधील अचूकपणा बाबतही दक्षता घेतली गेली. जे जसे आणि जेवढे घडेल तेवढीच नोंद करणे हे प्रथमपासून पाळण्यात आले. उदा. महिलांची विविध कार्यक्रमांतील/शिबिरांमधील उपस्थिती, पार पाडलेले उपक्रम इ. त्यामुळे एक खोटे सांगितल्यामुळे दहा गोष्टींबद्दल खोटी माहिती सांगण्याची वेळ आली नाही.

प्रकल्प कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेली मजबूत अशी संघ भावना. कामाच्या सोयीसाठी गावाची, जबाबदाऱ्यांची विभागणी निश्चितपणे केलेली आहे. परंतु ती जाचक होईल अशी अजिबात नाही. उलट प्रकल्पामधील कोणतेही काम कोणामुळेही अडून राहत नाही. 'अमूक एक काम माझे नाही' असे पूर्ण संघामध्ये कोणीच म्हणत नाही. कोणतेही काम अधिक चांगल्या प्रकारे पार पाडण्याची जबाबदारी सगळेच घेत असतात.

कामाच्या बाबतीत प्रत्येकाचा दुसऱ्यावर विश्वास आहे व आजपर्यंतच्या वाटचालीत या विश्वासाला कुठेही तडा गेलेला नाही. प्रकल्पामधील वातावरण अतिशय खेळीमेळीचे व आरोग्यकारक असे आहे. एकमेकांचे पाय ओढून स्वत:चे श्रेष्ठत्व सिद्ध करण्याची वृत्ती कोणामध्येही नाही. त्यामुळे आपापल्या विभागातील उपक्रम अधिक चांगले व जास्त प्रमाणात कसे होतील याकडेच सर्वांचे लक्ष असते.

प्रकल्पामार्फत फिल्ड सुपरवायझर्सना अनेक तऱ्हेच्या प्रशिक्षणात सहभागी होण्याची संधी मिळाली. उदा. समूह कृती संगम, प्रजनन व बाल आरोग्य, किशोरवयीन मुलांचे आरोग्य, एच.आय.व्ही.एड्स वगैरे. त्यामुळे विविध विषय कसे घ्यावेत, कसे मांडावेत याची माहिती त्यांना वेळोवेळी मिळत गेली व ते उत्तम असे प्रशिक्षक बनले. कुठल्याही विषयाशी सुसंगत व मुद्देसूद मांडणी, विचारांची पक्वता हे गुण त्यांनी विकसित केले.

त्यांना एक गोष्ट आवर्जून सांगितली होती की ते क्षेत्रभेटी अधिक वेळा करतात. गावातील घडामोडी त्यांना लगेच कळू शकतात म्हणजेच ते प्रकल्पाचे कान व डोळे आहेत. जे काही गावात, समाजात घडते ते किंवा प्रकल्पाच्या कार्यक्रमावरील प्रतिक्रिया वेळोवेळी अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी त्यांनी पार पाडली. त्यानुसार प्रकल्पाला आपली धोरणे, कार्यक्रम इ. गोष्टी अधिक चांगल्या रीतीने राबविणे सोपे गेले.

प्रकल्पामध्ये बचतगट, त्यांना बँकेकडून दिली जाणारी कर्जे, शैक्षणिक मदत, इ. उपक्रमांमुळे पैशाची उलाढाल नेहमीच होत असते. परंतु सर्वच व्यवहारामध्ये पारदर्शकता आहे. व प्रत्येकजण आपल्याकडे

येणाऱ्या जाणाऱ्या पैशाची नोंद काटेकोरपणे ठेवत असतो. त्यामुळे गेली ७–८ वर्षे चाललेले पैशाचे व्यवहार अतिशय शिस्तीत व सुरळीत चालू आहेत.

महिला कर्मचारी, गावातील महिला, व मुलींबरोबर सतत काम करीत असताना पुरुष कार्यकर्त्यांना अनेक बाबतीत दक्षता घ्यावी लागते. तिघांनीही ही जबाबदारी समर्थपणे पेललेली आहे. स्वतःचे चारित्र्य स्वच्छ असणे व ठेवणे, निर्व्यसनीपणा व जबाबदारीने वागणूक ह्या बाबतीत ते अत्यंत दक्ष आहेत. गेली ६–७ वर्षे ते प्रशिक्षक म्हणून काम करीत आहेत.प्रशिक्षक म्हणून त्यांनी इतर संस्थांतील कार्यकर्ते, शासकीय कर्मचारी इ. अनेक जणांना प्रशिक्षण दिलेले आहे. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढलाच आहे; परंतु इतर संस्थांच्या कार्यकर्त्यांच्या तुलनेत आपण कुठे कमी पडतो किंवा नाही हेही त्यांनी पडताळून पाहिले आहे. तसेच हा प्रकल्प बघण्यासाठी अनेक देशी–विदेशी पाहुणे येऊन गेले. त्यांच्याशी झालेली चर्चा किंवा त्यांनी विचारलेल्या विविधांगी प्रश्नांमुळे नेमक्या कोणत्या सुधारणा करणे आवश्यक आहे हेही त्यांच्या लक्षात आले.

म्हणजेच आज हे तिघेही वेळेचे उत्तम नियोजन, कामाचे व्यवस्थापन व अंमलबजावणी अतिशय उत्तम रीतीने करु शकतात.

प्रकाश चौधरी

जेमतेम १० वी पर्यंतचे शिक्षण. कौटुंबिक परिस्थिती बेताची. वडील दिवाणजी. पोटापुरती जमीन; परंतु सतत दुष्काळी परिस्थिती.अशा परिस्थितीत अर्थार्जनासाठी काहीतरी काम करणे आवश्यक होते. म्हणून मी सामाजिक वनीकरण विभागात कामाला सुरुवात केली, परंतु तिथे असणारा गोंधळ, व्यसनाधीनता यामुळे वैतागून गेलो. पैसा मिळत होता; पण समाधान नव्हते. नवीन काही ज्ञान मिळत नव्हते. व्यसनी लोकांचा तिटकारा, त्यामुळे कामातरस वाटत नव्हता. याच काळात के.ई.एम. हास्पिटल संशोधन विभागामार्फत चालणाऱ्या युवती आरोग्य व विकास प्रशिक्षण प्रकल्पात संधी मिळाली.

फिल्ड सुपरवायझर म्हणून संधी मिळाली; परंतु मनामध्ये खूपच भीती वाटत होती. दडपण येत होते. कुटुंब व नातेवाईक महिला, मुलींशी बोलताना मी लाजणारा, बुजणारा माणूस. मला या कामाची भीती वाटत होती. दडपण येत होते. अवघड वाटायचे, दबल्यासारखे वाटे. कारण या प्रकल्पात अधिकारी महिला, ज्यांचेकडून काम करुन घ्यायचे त्या पण महिला आणि ज्यांच्यासाठी काम करावयाचे याही महिलाच. माझी ही अडचण व दबलेपणा/ भित्रेपणा प्रकल्प अधिकाऱ्यांच्या नजरेतून सुटला नाही आणि त्यांनी मला धीर आणि प्रोत्साहन द्यायला सुरुवात केली.

प्रकल्पाची प्राथमिक कामे – त्यामध्ये कुटुंब सर्वेक्षण, ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य व पदाधिकाऱ्यांना भेटी देणे, मुख्याध्यापक व नागरिक

यांच्या भेटीगाठी, यातून मला आधार आला. केलेल्या कामाचे कौतुक होऊ लागले. त्याचबरोबर पाच, सहा वेळा मुक्कामी प्रशिक्षण शिबिरे केल्यामुळे माझ्यातील सुप्त गुणांना खतपाणी मिळाले व काम करण्यास वाव मिळाला. प्रशिक्षणामध्ये इतर विषयांचे ज्ञान तर मिळालेच शिवाय महिला व मुलींबरोबर काम करताना काय पथ्ये पाळावीत याचेही ज्ञान मिळाले. त्याचा मला आजपर्यंत तर फायदाच झाला; परंतु उर्वरित आयुष्यातही त्याचा फायदाच होणार यात शंका नाही.

कोणतेही काम करताना सुरुवात ही अवघडच असते. प्रकल्पाच्या सुरुवातीस मी सायकलवरुन तीन गावांमध्ये काम करत होतो; बऱ्याचवेळा केंद्र रात्री ८ ते १० वाजेपर्यंत असायचे परंतु याच परिसरातील असल्यामुळे भीती वाटली नाही. तब्बेतही चांगली होती. मह–त्वाचे म्हणजे मी इतरांपेक्षा वेगळे काहीतरी करतोय की ज्याचा समाजाला उपयोग होतोय, त्यामुळे कितीही कष्ट पडले तरी मागे हटायचे नाही ही मनात जिद्द. नुसतीच जिद्द असूनही उपयोग नसतो, त्यासाठी वरचेवर मार्गदर्शन मिळत होते. विविध विषयांचा अभ्यास करत होता.

अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाची छोटीशीच; परंतु नीटनेटकी लायब्ररी होती. तेथून पुस्तके नेऊन वाचन करीत होतो. वाचलेले विषय सर्वांसमोर मांडण्याची संधी प्रकल्पातून माझ्यासह सर्वांनाच वारंवार दिली जात होती. त्यावर चर्चा घडवून आणली जात होती, त्यामुळे आणखी अभ्यास करावा लागत होता, त्यातून नवनवीन कल्पनांना वावही मिळत होता. वेगवेगळ्या कार्यकर्त्यांच्या विविध अनुभवांची देवाण–घेवाण केल्यामुळे ज्ञानात भर पडत गेली. थापा मारण्यास, खोटे बोलण्यास वाव नव्हता. कोणी खोटे बोलण्याचा प्रयत्न केल्यास ते उघड होत होते, त्यामुळे अंगी प्रामाणिकपणा निर्माण झाला. एखादे काम नाही करता आले तर पुन्हा पुन्हा प्रयत्न करावयाचा; पण खोटं बोलून चालत नव्हते.

याच प्रकल्पामध्ये व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण शिबिरामध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली आणि त्यातून जीवन उजळून निघण्यास मदत झाली. बुद्धीला चालना मिळाली. चांगला वक्ता म्हणून बोलण्याचे धाडस आपण निर्माण करु शकतो, याबाबत ज्ञान झाले. आज कितीही मोठा जनसमुदाय असेल तरी मी माझी मते न डगमगता मांडू शकतो यातून धाडस वाढले. आपल्याला कोणतेही काम अशक्य नाही, याची जाणीव झाली आणि वस्तीमधील दोन – तीन मित्रांच्या सहकार्याने विचार विनिमय करुन 'पाबळेश्वर नागरी सहकारी पतसंस्था' सुरु केली.

प्रकल्पाचा आणखी एक अलिखित नियम आहे. 'आधी करा मग सांगा' त्याप्रमाणे प्रकल्पामध्ये सुरुवातीस प्रकल्प कार्यकर्त्यांचा बचतगट सुरु झाला, त्याचे फायदे तोटे अनुभवता आले. नंतर विविध गावात गट सुरु केले. 'अभ्यास करा मग बोला', स्वत: करा नंतर सांगा त्याप्रमाणे मी सुद्धा नियमांचे पालन केले.

प्रकल्पामध्ये गेल्या पंधरा वर्षामध्ये प्रकल्पाशी संबंधित विषयांबाबत ५ ते ६ वेळा प्रशिक्षण मिळाले हे अगोदरच सांगितले आहे. त्याचबरोबर; आर.टी.आय./ एस. टी.आय, पंचायतराज प्रकल्प, आर यु ४८६, भविष्यवेध,

समूह कृती संगम अशा विविध प्रकल्पांमध्ये त्या–त्या विषयांचे भरपूर प्रशिक्षण मिळाले; परंतु त्याचबरोबर प्रशिक्षणानंतर स्वत: हे ज्ञान समाजापर्यंत (महिला, मुली, पुरुष, राजकारणी मंडळी, शासकीय कर्मचारी) पोहोचविण्याची संधी मिळाली,त्यामुळे प्रशिक्षकासाठी लागणारी विविध कौशल्ये प्राप्त होत गेली व ते वापरण्याची संधीही वरचेवर लाभली. विचार प्रगटीकरणाची संधी मिळत गेली. यातूनच स्वत:च्या नेतृत्व गुणांना वाव मिळाला. त्यामुळे स्थानिक पातळीवर विविध राजकीय, सामाजिक, धार्मिक उपक्र मांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची सवय झाली. त्याचा समाजात स्वत:चे स्थान उंचावण्यास मदत झाली.

महिला आरोग्य व विकास प्रशिक्षण केंद्रामध्ये चालू असलेल्या विविध उपक्र मांची सर्वच थरांतून वाहवा होत गेली. विशेषत: के. ई.एम हॉस्पिटल संशोधन विभाग याठिकाणी चालू असलेल्या कोणत्याही प्रकल्पाचे कामकाज पाहण्यासाठी पाहुणे आले तर त्यांची पाबळ प्रशिक्षण केंद्रामध्ये हमखास भेट घडवून आणली जाते. त्यामुळे प्रकल्पाचे कामकाज/उपक्रम समजून घेण्यासाठी देश–विदेशातून पाहुणे येत असतात. त्यांच्या येण्यामुळे आर्थिक फायदा झाला नाही तरी माझ्यासारख्या सर्व कार्यकर्त्यांना त्यातून प्रेरणा मिळाली व नियोजनाची संधी मिळाली. आपण केलेल्या कामाची ती एक प्रकारे पावतीच म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

प्रकल्पामध्ये सतत काहीतरी नवीन गोष्टी समजून घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्याची संधी मिळाली. त्यामुळे प्रत्येक काम जास्तीत जास्त चांगले कसे होईल, त्यामध्ये असणाऱ्या त्रुटी कशा कमी करु शकतो याबाबत चर्चा, अनुभवांची देवाण घेवाण व मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे कामामध्ये होणाऱ्या चुका कमी होत गेल्या. त्याचा उपयोग वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक कार्य करताना लक्षात आल्यामुळे कामामध्ये अचूकता येत गेली.

गेल्या ८–१० वर्षामध्ये महिलांचे बचत गट, कावाकामी तर्फे महिलांना दिली जाणारी बिनव्याजी मदत, शैक्षणिक कर्ज, बँकेकडून गटांना वाटण्यात आलेली लाखो रुपयांची कर्जप्रकरणे या सर्व ठिकाणी पैशाचा संबंध सतत येत असतो. परंतु सुरुवातीपासून मिळत गेलेले ज्ञान, यातून लागलेली चांगली सवय त्यामुळे प्रत्येक वेळी पैशाचे व्यवहार अत्यंत पारदर्शकपणे प्रकल्पात राबवले जातात. प्रत्येकजण आपल्याकडे जमा झालेल्या रकमेचे हस्तांतरण होत असताना दैनंदिन किंवा योग्य त्या ठिकाणी नोंदी ठेवतो. आपापसात चर्चा केली जाते. त्यामुळे पैशाचा कधीही गैरवापर, अपहार किंवा भ्रष्टाचार झालेला नाही. त्याचा उपयोग वैयक्तिक व सार्वजनिक जीवनातही व्यवहार पारदर्शक व विश्वासपात्र होण्यास मदत झाली.

त्याचप्रमाणे एकमेकांवरचा विश्वास दृढ होत गेला. प्रकल्प कार्यकर्ते यांचा एकमेकांवर असणारा विश्वास यामुळे कोणताही व्यवहार होताना खोटे बोलण्याची गरजच पडत नाही. प्रत्येकजण दुसऱ्यास मदत करण्यास, एखाद्याच्या गैरहजेरीत त्याचे काम करण्यास मागे पडत नाही. आपोआपच सर्व कामे समूह कार्य म्हणून पार पाडली जातात.

थोडक्यात प्रकल्पातून काय मिळाले तर कौशल्य प्राप्त करण्यासाठी संधी, महिला व

मुलींच्या बद्दल आदराची भावना, विचार मांडण्याची संधी, गुणवत्ता वाढीसाठी केले जाणारे प्रयत्न, नवनवीन कल्पनांना वाव, अभ्यासू वृत्ती, कामामध्ये अचूकता,कामातील शिस्त, स्वयंप्रयोग, स्वयंनिर्णय, एकमेकांवर विश्वास, बोलावे तसे वागावे,पैशाचा चोख व्यवहार, सकारात्मक दृष्टिकोन , मेहनतीचे फायदे या आणि इतर गोष्टींचे फायदे होत गेले.

प्रकल्पामध्ये स्थानिक लोकांची निवड करुन त्यांना प्रशिक्षण मार्गदर्शनातून जास्तीत जास्त स्वयंपूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो त्याचा मलाही लाभ झाला. माझे वैयक्तिक जीवन व प्रकल्पाच्या कामासाठीही त्याचे फायदे झाले ते पुढीलप्रमाणे-

- परिसराची पूर्ण ओळख.
- स्थानिक पुढारी, कार्यकर्ते, महिला, शिक्षक, प्रतिष्ठित नागरीक, यांचा चांगला परिचय.
- प्रकल्पाचे उपक्रम पार पाडताना सामाजिक प्रतिष्ठा त्यामुळे वैयक्तिक कामे सहज होतात.
- सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमात सक्रीय सहभाग, त्यामुळे प्रतिष्ठा वाढली व लोकांच्या अडीअडचणी सोडविण्यास मदत झाली.
- शेती, दुग्धव्यवसाय, समाजकार्य यासाठी वेळ मिळतो. यातून प्रतिष्ठेबरोबर उत्पन्नात भर पडते.
- गावातच घर, त्यामुळे घरगुती खर्चात खूपच बचत होते.
- लोकांचा परिचय असल्याने विश्वास बसतो.
- समाज/लाभार्थी व कर्मचारी यांच्या स्वभावाची ओळख असल्याने निर्णय घेणे सोपे जाते.

●●

नवनाथ जिते

मी १९८९ सालापासून फिल्ड सुपरवायझर म्हणून कामास सुरुवात केली. पहिल्यांदा कामात रुजू झालो तेव्हा काम काय आणि कसे करायचे याबद्दल काहीच कल्पना नव्हती. पहिलेच निवासी प्रशिक्षण शिबिर पाच दिवसांचे झाले त्यातून कामाचे स्वरुप कळण्यास खूपच मदत झाली. लोकांशी बोलताना, चर्चा करताना शंका यायची की लोक आपले ऐकतील का? महिला मुली आपल्या म्हणण्याप्रमाणे कार्यक्रमाला येतील का? असे अनेक 'का?' माझ्यापुढे होते. परंतु हळूहळू सगळे जमत गेले. मुलींचे केंद्र चालवीत असताना विशेषत: १५ वर्षे वयापुढच्या मुलींच्या शिबिरात शिकविताना दडपण यायचे कारण मुली ८ वी-९ वी, क्वचित १० वी पर्यंतही शिकलेल्या असायच्या. त्यांना दोन तासांमध्ये विविध आरोग्य विषयांची माहिती देणे, काही मनोरंजनात्मक कार्यक्रम घेणे यासाठी दोन तास खूप वाटायचे. सुरुवातीला असे केंद्र संपले की मी सुटकेचा निश्वास टाकत असे. शिवाय सुरुवातीला ही केंद्रे, महिलांच्या सभा या रात्रीच्या वेळी असत. सभा संपल्यावर १०-११ वाजता सायकलवरुन ८-१० किमी जाणे जीवावर यायचे. काम सोडून द्यावे असे वाटायचे. परंतु दुसरे मन सांगायचे 'दु:खा'ची दरी ओलांडल्याशिवाय सुखाची हिरवळ दिसत नाही'.मग परत जोमाने कामास लागत असे.

कार्यक्रमाची वेळ दिवसा-रात्री कधीचीही असो, मी वेळेआधी पाच-दहा मिनिटे तिथे हजर असायचो. माझ्या आठवणींप्रमाणे एकदा किंवा दोनदाच असे झाले की मी पोचायच्या आधी आमच्या अधिकारी वर्गापैकी कोणीतरी आधी

पोहोचलेले होते. त्यावेळी मला इतके अपराध्यासारखे वाटले व मी मनातल्या मनात खजील झालो. आजही आमच्या प्रकल्पामध्ये तोच शिरस्ता चालू आहे. वेळेचे बंधन पाळण्याचा. अशातऱ्हेने जवळ जवळ पहिली ४–५ वर्षे आम्ही मानधनावर काम करत होतो. त्यानंतर आम्हाला पूर्ण वेळ कार्यकर्ते म्हणून नेमण्यात आले.

आम्हाला वारंवार सांगण्यात आले की आयुष्यभर माणूस शिकत असतो. त्यामुळे उशिरा शिक्षण घेण्याची लाज वाटून घेऊ नका. म्हणून मी व सहकारी यांनी टिळक महाराष्ट्र विदयापीठातर्फे चालवण्यात येणाऱ्या मुक्त विद्यापीठात बी.ए. साठी फॉर्म भरला. त्याचा अभ्यासही व्यवस्थित करीत होतो. परंतु काही वैयक्तिक व घरगुती अडचणींमुळे मला ते अर्ध्यावरच सोडावे लागले.

माझा स्वभाव प्रथमपासूनच अभ्यासू. त्यामुळे नवीन विषय घ्यायचा आहे असे सांगितले की आजही त्या विषयाचे सविस्तर वाचन करतो. त्याची टिपणे काढतो, नंतर ढोबळ मुद्दे लिहून काढतो व त्या आधारे विषय घेतो. त्यामुळे विषय व्यवस्थित मांडला जातो.

आपल्या प्रशिक्षण केंद्रामार्फत आपण महिला व मुलींना विविध विषयांची माहिती देतो. ही माहिती आसपासच्या परिसरामध्ये मिळण्याची दुसरी कोणतीच सोय नाही. त्यामुळे त्याच्याकडून आपल्याला चांगला प्रतिसाद मिळतो. आपल्या सर्व उपक्रमांव्दारे महिला जीवनात सुखी कशा होतील यासाठी प्रयत्न केले जातात. बचतगट स्थापना व गटांची राष्ट्रीयकृत बँकाशी जोडणी त्यामुळे त्यांना आर्थिक लाभ निश्चितपणे होऊ लागला आहे. त्याचबरोबर विविध शासकिय योजनांची माहितीही आपल्याकडून दिली जाते. त्यामुळे लोकांचा सहभाग चांगला असतो. ह्या प्रकल्पामुळे महिलांच्या जीवनात बदल झालेला जाणवतो. उदा. पूर्वी मिटींगला न येणाऱ्या महिला स्वत:हून पुढाकार घेऊन नवीन बचत सुरु करतात. गटातील महिला 'शिक्षक स्वागत' या निमित्ताने शाळेत जातात, शिक्षकांशी परिचय करुन घेतात. काही जणी सभाधीट झाल्या आहेत. या सर्व कामाला माझाही हातभार आहे, याचा मला यथार्थ अभिमान वाटतो.

थोडक्यात सांगायचे तर काम करण्यासाठी नुसते शिक्षण महत्त्वाचे नाही तर काम चांगल्या प्रकारे करुन दाखवण्याची, अपार कष्ट करण्याची तयारी, जिद्द, विचारांची देवाणघेवाण, लोकांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर उपाय शोधणे, आपले मत दुसऱ्यावर न लादणे इ. गोष्टी फार महत्त्वाच्या असतात.

बचतगटासारख्या उपक्रमामुळे गावातील महिला, पुरुष यांच्याशी जास्त जवळीक निर्माण झाली व विश्वासाचे नाते निर्माण झाले. शिवाय शालेय शिक्षणासाठी मुलींना दिले जाणारे अर्थसहाय्य, कावाकामी फाउंडेशनकडून उपलब्ध होणारे बिनव्याजी कर्ज यामुळे लोकांना वाटू लागले की जे खरोखरीच गरीब व गरजू आहेत त्यांच्यापर्यंत ही मदत पोहोचते आहे. परिसरातील बालवाड्यांना आपल्या प्रकल्पामार्फत शैक्षणिक साहित्य मिळाले. विना अनुदानित शाळांना प्रयोगशाळेतील साहित्य मिळाले. त्यामुळे सुद्धा गावकऱ्यांचा आपल्या प्रकल्पाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. आणि हे सर्व आमच्या मार्फत त्यांच्यापर्यंत पोचत असल्याने आम्हाला गावागावातून चांगला प्रतिसाद, प्रतिष्ठा मिळू लागली आहे.

आज शिक्षण कमी म्हणून न्यूनतेची भावना माझ्या मनात कुठेतरी नक्की आहे. पण एकीकडे हे समाधान ही आहे की मी कुठलेही प्रशिक्षण प्रभावीपणे घेऊ शकतो. महिला, मुली, पुरुषांनाही ते आवडते, याची पण मला खात्री आहे.

अजून एक पथ्य नेहमी पाळले जाते, ते म्हणजे खोटी आश्वासने न देणे. फिल्ड मध्ये काम करीत असताना आम्ही कुठल्याच बाबतीत बढाया मारीत नाही त्यामुळेही लोक आमच्यावर सर्वच बाबतीत विश्वास ठेवतात.

●●

बाळासाहेब भुजबळ

महिला आरोग्य व विकास प्रशिक्षण केंद्रात फिल्ड सुपरवाझर म्हणून काम केल्यामुळे माझ्यामध्ये अनेक बदल घडून आले. किंबहुना एक वेगळेच व्यक्तिमत्व आकाराला आले, असे म्हटले तरी ते वावगे ठरु नये. त्यातलेच मह-त्वाचे मुदूदे खाली देत आहे.

● प्रकल्पाच्या प्रत्येक सभेच्या वेळी आम्ही सर्वजण सानेगुरुजींची 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' ही प्रार्थना म्हणत असतो. प्रार्थनेत हीन, दीन, पददलित ही सर्व परमेश्वराची लेकरे असून त्यांना दु:खी करु नका, मदतीचा हात दया, त्यांना तुच्छ लेखू नका, सर्वांवर प्रेम करा हीच शिकवण दिली जाते. प्रकल्पामध्ये काम करीत असताना हेच भाव आमच्या मनात असतात.

● प्रकल्पात आल्यानंतर शिक्षणाचा खरा अर्थ समजला, वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये वाचन, अभ्यास, चिंतन व मनन करण्याची सवय लागली. अभ्यासानंतर प्रत्यक्ष सादरीकरण करण्यासाठी उपयोग झाला. शिक्षण ही जन्मापासून मरेपर्यंत न संपणारी प्रक्रिया आहे याची प्रचिती आली. महिला, मुली, पुरुष शिबिरे यामध्ये सतत आरोग्य व इतर विषय शिकवण्याची संधी उपलब्ध असते, त्यामुळे शिक्षण कमी असूनही नवनवीन गोष्टी शिकल्यामुळे विषय घेताना अडचण वाटत नाही.

● आपण जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक ठेवला पाहिजे, वास्तवतेला सामोरे जाण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे. आजूबाजूच्या घडामोडींबाबत सतत जागरुक रहावे. त्या त्या प्रसंगी धावून जावे. कार्यकर्ते म्हणजे प्रकल्पाची पंचेद्रिये आहेत याची जाणीव प्रकल्पाने सातत्याने दिली.

● पूर्वी कोणतेही काम करताना मनात भीती असे. एखादे काम करण्याअगोदर ते होईल की नाही हे दडपण वाटत असे. मनस्थिती सतत व्दिधा असायची, करु का नको !पण प्रकल्पात आल्यापासून स्वभावातील भित्रेपणा कमी झाला. वागणे, बोलणे, निरीक्षणातून समोरचा माणूस कसा आहे हे ओळखण्याची कला अवगत झाली. त्यामुळे अडचणी दूर व्हायला मदत झाली. पूर्वीचा स्वभाव आणि आजचा स्वभाव यात खूप फरक पडला. आता चिकाटी व धाडस वाढले आहे.

● नकारात्मक विचार माणसाला भित्रा बनवितात. जाऊ का नको? करु का नको? होईल का नाही? असे करत सुरुवातीला काम सुरु केले; परंतु त्यामुळे काम होत नव्हते किंवा अपूर्ण राहात असे. परंतु वारंवार मार्गदर्शनातून विचारामध्ये परिवर्तन

घडून आले. पूर्वतयारीनिशी कामाला सुरुवात करु लागलो. आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. त्यातून सकारात्मक दृष्टिकोन तयार होऊ लागला. प्रकल्प अधिकारी यांनीही सतत वेगवेगळया आयडिया दिल्या त्यामुळे विचारपूर्वक केलेल्या कामाचे यश दिसू लागले.

- आजही सर्वसाधारण समाजात महिलांच्या सद्यस्थितीचा विचार करता महिलांना दुय्यम दर्जा दिला जातो, परंतु प्रकल्पाच्या सततच्या मार्गदर्शनाने लिंगभेदभाव क मी झाला. त्यामुळे महिला व मुलींच्यामध्ये काम करताना कमीपणा किंवा लाज व भीती वाटत नाही. सुरुवातीच्या काळात लाज व भीती दोन्ही वाटत होते. त्याचप्रमाणे प्रत्येक ठिकाणी व स्वत:च्या कुटुंबातील महिलांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी स्वावलंबी होण्यासाठी व त्यांचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीने होण्यासाठी सतत प्रयत्नशील असतो. लहान मुलींना आपल्या मुलींप्रमाणे, तरुण असेल तर आपल्या बहिणींप्रमाणे आणि वयस्कर असेल तर आपल्या मावशी प्रमाणे, त्यांच्याशी वागण्याची शिकवण मला प्रकल्पातून मिळाली.

- प्रकल्पामुळे मला तळागाळातील समाजापर्यंत काम करण्याची संधी मिळाली. त्यांना केलेल्या मदतीसाठी मला थोडे तरी काम करता आले, खारीचा वाटा मिळाला. प्रकल्पाने समाजातील गरजू लोकांपर्यंत जास्तीत जास्त ज्ञान व मदत देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे काही लोकांच्या परिस्थितीत सुधारणा झाली. काहींना असाह्य रोगांवर उपचार मिळाला, काहींची शासकी य रखडलेली कामे मार्गी लागली. हे लोक सतत भेटतात, मी विचारतो, बाई कसे काय आहात? म्हटल्यावर बाई म्हणते, 'भाऊ मजेत आहे, या ना चहा घेऊ ! हे ऐकून मनाला खूप आनंद वाटतो, आणि त्यामुळे मी सतत आनंदी असतो.

तळागाळातील समाजासाठी उपलब्ध होऊ शकणाऱ्या विविध योजनांची मिळणारी माहिती, विविध प्रसार माध्यमातील माहितीचे संकलन व चर्चा आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी व्यासपीठ सर्व कार्यकर्त्यांना सतत खुले असते. त्यामुळे प्रशिक्षणाच्या विविध पद्धती सर्वांना समजू शकल्या. शिवाय लाभार्थींना लाभही मिळवून देण्यास मदत झाली.

- आपली वर्तणूक सतत चांगली ठेवा. एकदाच चांगले वागून भागणार नाही, तर आयुष्यभर सतत आपली वर्तणूक चांगलीच असली पाहिजे. त्याचाच प्रत्यय म्हणून कार्यक्षेत्रात असणाऱ्या आठही गावातील लोकांचा माझ्यावर विश्वास आहे. महिला, तरुण मुली, शेतकरी यांच्याकडून मान मिळतो. महिला व मुलींच्या शिबिरासाठी महिला आणता येतात. बचतगटातील कावाकामी व इतर लाभार्थी यांचे आर्थिक व्यवहार आणि नोंद व्यवस्थित ठेवल्यामुळे त्यांना माझ्याविषयी विश्वासार्हता वाटते की हा माणूस कोणाला फसवणार नाही, लुबाडणार नाही. यामुळेच चांगली वर्तणूक ही माझी दैनंदिन गरज झालेली आहे.

- प्रत्येक कार्यकर्त्यासाठी दैनंदिनी ठेवणे अत्यंत मह-त्वाचे असते. प्रकल्पात काम करण्याअगोदर कोणत्याही प्रकारची नोंद ठेवत नव्हतो, परंतु सध्या दैनंदिनीला खूप महत्व देतो. दैनंदिनी ठेवल्यामुळे जुन्या नोंदी, घटना, प्रसंग याची माहिती मिळते. अहवाल लिखाणास तर खूपच मदत होते. शिवाय काही गुंतागुंतीचे आर्थिक व्यवहार सुध्दा दैनंदिनीमुळे पूर्ण करता आलेले आहेत.

• प्रकल्पामध्ये वेळेला खूप महत्व दिलेले आहे. अधिकारी स्वत:च वेळ पाळण्याला महत्व देतात, तीच सवय मला लागली. त्यामुळे स्वत:चा आणि इतरांचाही वेळ वाया जात नाही.

• विविध प्रकारच्या व्यसनांचे दुष्परिणाम याबाबत सतत चर्चा होते. त्यामुळे वाईट व्यसनांपासून दूर राहण्याचा प्रयत्न केला. मला स्वत: व इतर मित्रांना गुटख्याची सवय जडली होती; परंतु गावातील तरुणांना एकत्र करुन त्यावर चर्चा केली आणि सर्वांनी गावात आजपासून गुटखा खाणे बंद करण्यासाठी गुटखा पुडया एकत्र करुन होळी केली.

• सतत कोणत्या ना कोणत्या कामात गुंतवून घेतल्यामुळे आळस कमी झाला. दिवसभरात आपण काय चुकलो याचा विचार करण्याची सवय लागली. काम करताना कुणावर कुरघोडी केली नाही. आपापसातील वाद तडजोडीने मिटवण्याचा प्रयत्न करतो. गावामध्ये आपापसात शेतीवरुन, नवरा बायकोच्या गैरसमजातून व इतर कोणत्याही कारणाने भांडण उद्‌भवले तरी मिटवण्यासाठी मला आवर्जून बोलावतात.

• विविध बचत गटातील महिला, मुली यांच्याशी वागताना कोणत्या प्रकारची पथ्य पाळणे आवश्यक आहे याचे वारंवार मार्गदर्शन मिळाल्यामुळे समाजातील सर्व घटकांशी मैत्रीपूर्ण संबंध स्थापन झाले. सर्वांशी प्रामाणिकपणे वागण्याचे प्रोत्साहन मिळत गेले. महिला कार्यकर्ते आणि त्याचे कुटुंब यांच्याशी जिवाभावाचे संबंध निर्माण झाले. प्रत्येक व्यवहार करताना सर्वांचे विचार ऐकून घेऊन, चर्चा करुन सर्वांसमोर मांडल्यामुळे व्यवहारात पारदर्शीपणा निर्माण झाला.

• एकदा खोटे बोलले की ते पचविण्यासाठी वारंवार खोटे बोलावे लागते. खोटे हे खोटे असल्यामुळे बाहेर पडतेच आणि लोकांचा आपल्यावरचा विश्वास कायमचा जातो, म्हणून कधी खोटे बोलू नये. खोटी आश्वासने कोणाला देऊ नयेत ही शिकवण प्रकल्पातून मिळाली.

• प्रकल्प उपक्रम पार पाडण्यासाठी सतत विविध कार्यक्रमांचे नियोजन करावे लागते. त्यामुळे आपोआपच प्रत्येकाच्या अंगभूत गुणांना वाव मिळतो. महिला, मुली व तरुणांची शिबीरे, महिलांचे विविध कार्यक्रम अशा नित्याच्या कार्यक्रमांमुळे मला नेतृत्वाची संधी मिळत असते. त्याचाच उपयोग मला गावामध्ये होत गेला. गावातील सार्वजनिक कार्यक्रमात मी हिरीरीने भाग घेतो. यात्रेला पैशाचा सर्व व्यवहार माझ्याकडे सोपवितात. गावामध्ये आरोग्य शिबीरे व रक्तदान शिबीराचे आयोजन यासाठी याचा खूप उपयोग झाला.

• प्रकल्पामध्ये आल्यापासून प्रकल्पाशी संबंधित ८–१० आरोग्यविषयक प्रशिक्षण कार्यक्रम झाले. शिवाय दर महिन्याच्या मिटींगमध्ये सुद्धा नवनवीन गोष्टींची माहिती मिळते. विविध पुस्तकांचे वाचन व चर्चा होते. त्याचप्रमाणे किशोरी विकास, बचतगट, भविष्यवेध, पंचायतराज, आर टी आय, एड्स, समूहकृती संगम, आरोग्य विषयक सूक्ष्म नियोजन, पुरुष प्रजनन आरोग्य अशा विविध प्रकल्पांचे प्रशिक्षण तर मिळालेच, त्याचप्रमाणे यातील संबंधित विषय शिकविण्याची संधी मिळाली. या सर्व गोष्टींचा वैयक्तिक जीवनात फायदा तर झालाच त्याचबरोबर स्वत:ची गुणवत्ता वाढविण्याची व ती सिद्ध करण्याची संधीही मिळाली.

• सेडपा, नवी दिल्ली या संस्थेतर्फे आम्हाला भविष्यवेध प्रकल्पात काम करण्याची संधी मिळाली. त्यामध्ये ६ वी ते ९ वी पर्यंतच्या मुलांसाठी जवळजवळ ६० विषय शिकवण्यात आले. त्यातून आम्हाला भरभरुन ज्ञान मिळाले.

• प्रत्येक काम करताना त्याची आकडेवारी सादर करताना आपल्या कामाचा दर्जा उत्तम कसा राहील याकडे भर दिला जातो. त्यामुळे संख्यात्मक वाढ गुणात्मक कशी होईल हेही पाहिले. त्यामुळे अहवालामध्ये सर्व बारीक सारीक गोष्टी लिहिण्याची सवय जडली आहे.

• प्रकल्पामध्ये काम करताना आमच्या सहकाऱ्यांबरोबर नेहमी खिलाडू वृत्तीने स्पर्धा चालू असते. इतरांचे जेवढे काम झाले त्यापेक्षा आपले काम जास्त कसे होईल याची स्पर्धा असते. यामध्ये कुठेही व्देष, मत्सर व भांडणाचा लवलेश नसतो; परंतु त्यामुळे प्रत्येकाला आपल्याला शाबासकी कशी मिळेल, यासाठी प्रयत्न चालू असतात. स्पर्धेमध्ये नंबर पहिलाच आला पाहिजे असा काही हेतू नसतो; परंतु स्पर्धेमुळे आपल्या मनाला यशप्राप्तीचा आनंद होतो आणि कामेही सहज पार पडतात.

आमचा प्रकल्प हा टिमवर्कचा एक चांगला नमुना आहे. सर्वांना आपापली कामे ठरवून दिलेली आहेत; परंतु प्रत्येकजण दुसऱ्याला मदत करण्यास, त्याच्या गैरहजेरीत त्याची उणीव भरुन काढण्यात सतत तत्पर असतात. प्रत्येकाचा कागदोपत्री हुद्दा ठरलेला आहे . परंतु त्यामध्ये वरिष्ठ आणि कनिष्ठ असा भेदभाव करत नाही. प्रत्येकजण दुसऱ्याचा मनापासून आदर करतो. आपल्यापेक्षा ज्येष्ठांवर नितांत श्रद्धा बाळगतो. प्रत्येकजण दुसऱ्याचा विश्वास कमवण्याचा प्रयत्न करतो. आम्ही सर्व एकमेकांच्या वैयक्तिक व कौटुंबिक सुखदु:खात सहभागी होतो. आमचा प्रकल्प हे एक आदर्श कुटुंब आहे.

प्रकल्पात सतत नवनवीन गोष्टी शिकण्याची व शिकवण्याची संधी, विविध विषयांचे मत प्रदर्शनाची संधी, वेगवेगळ्या गावात व समाजात वावरण्याची संधी, गावात नेतृत्व करण्याची संधी, वेगवेगळ्या प्रकल्पात काम करण्याची संधी, प्रशिक्षक म्हणून वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्याची संधी, लोकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी मार्ग काढण्याची संधी या आणि इतर खूप संधी प्रकल्पातून सतत मिळत आल्या आहेत.

• एकमेकांच्या अडीअडचणी समजून घेऊन गटांचे आर्थिक व्यवहार पार पाडले जातात. त्यामुळे महिलांचे उत्तम संघटन होण्यास खूपच मदत झाली.

• आतापर्यंत प्रकल्पाचे कामकाज पाहण्यसाठी २२६ व्यक्तीगत तर २०–२५ गट, देशी, परदेशी, शासकीय व खाजगी संस्थांचे प्रतिनिधी असे विविध पाहुणे येऊन गेले. पाहुण्यांकडून प्रकल्प उपक्रमाचे होणारे कौतुक यामुळे उत्साह वाढण्यास मदत झाली. त्यांच्याकडून नवनवीन गोष्टींची माहिती मिळाली. त्यांच्याशी भाषेची अडचण असली तरी संवाद साधता आल्यामुळे ज्ञानात भर पडली. स्वत: व प्रकल्पाच्या उणीवा दूर करण्यासही पाहुण्यांचा फायदा झाला.

• विविध प्रकारची प्रशिक्षणे, तसेच पुनर्शिक्षणे, चर्चा, विचार मांडण्याची संधी, ताबडतोब मार्गदर्शन त्यामुळे उत्साह टिकून राहण्यास मदत

होते. स्वतःचे कुटुंब, कार्यक्षेत्र, प्रकल्प, प्रकल्प सहकारी, प्रकल्प अधिकारी यांचा मिळणारा आधार, सहानुभूती, मार्गदर्शन व संधी यामुळे एकमेकांबद्दल आस्था निर्माण झालेली असल्याने कामामध्ये कंटाळा, वैताग, मरगळ, आली तरी त्यामध्ये पुन्हा उत्साह मिळत राहतो.

- प्रकल्प हा ठराविक काळापुरताच असतो. त्यानंतर बंद होऊ शकतो. नंतर पुढे काय? हा प्रश्न उभा राहू नये म्हणून प्रकल्प प्रमुखांनी प्रत्येक महिला व पुरुष कार्यकर्त्यांना नवनवीन संधी देऊन उत्पन्नाचे मार्ग सुरु करण्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळे बहुतेकांनी काही ना काही जोडव्यवसाय सुरु केले व आपल्या कुटुंबाची प्रगती साधण्यास प्रयत्न केला. मी सुद्धा प्रकल्पातर्फे चालू असलेल्या बचतगटातून वेळोवेळी कर्ज घेऊन घर बांधले, दोनभावांची लग्ने केली. विहीर खोदली, पाईपलाईन केली, जर्सी गाय व बैल खरेदी केले, त्यामुळे कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली सुधारु लागली. त्यातून सामाजिक प्रतिष्ठेत सुद्धा भर पडली.

●●

(पृष्ठ ८ वरून)

गटही चालवितात. स्त्रियांना आर्थिक व्यवहार कळावयास लागले. त्याचे आरोग्य, सकस आहार इ. बाबत ज्ञानही वाढले. सुरुवातीला पुरुष महिलांच्या एकत्र येण्याबाबत साशंक होते. आपल्याविरुद्ध या स्त्रिया बोलत असतील असे त्यांना वाटायचे. परंतु पुरुषांच्या भाषेत प्रकल्पामुळे 'महिलांचे दडपण गेले, त्यांचे डोळे उघाड झाले. त्यांची नजर साफ झाली'. पूर्वी महिला गावपातळीवर काम करावयाच्या. पण आता त्या तालुका व जिल्हा पातळीवरही काम करतात. शहरातही स्वतंत्रपणे जातात.

आता पुरूषांनाही बचत गट हवे आहेत व शेतीकामाबद्दल प्रशिक्षण हवे आहे. बरेच तरूण शहरात कामास जात असल्यामुळे पुरुषांना एच.आय.व्ही. एड्सबद्दल जास्त माहिती हवी आहे. त्यांना वाटते की तरुणांनी शहरात काम करण्यापेक्षा गावातच सुधारित, आधुनिक शेती करावी.

पाबळ केंद्राचा फायदा गावातील महिलांच्या विकासात तर झालाच; परंतु गावपातळीवर काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना व पर्यवेक्षकांनाही झाला. त्यांचा व्यक्तिगत विकास व आत्मविश्वास आणि आत्मसन्मानही त्यामुळे वाढला. केंद्राचे काम बंद झाले तरी मनुष्यबळ विकासामुळे बचतगट चालूच राहतील असा विश्वास सर्वांना आहे.

प्रा. रा. के. मुटाटकर

महिला सबलीकरण

महिला आरोग्य व विकास प्रकल्पामुळे ज्यांना निरनिराळ्या संधी उपलब्ध झाल्या व ज्यांचे स्वत:चे व त्यांच्या कुटुंबाचे जीवनमान बदलले, त्या तीन समाज कार्यकर्तीची ही मनोगते.

तिघीही अगदी सर्वसामान्य घरातून आलेल्या. तिघींच्या आत्मनिवेदनात असे दिसते की तिघींनीही आधी कोणत्याही सामाजिक उपक्रमात भाग घेतलेला नव्हता. आपापल्या कौटुंबिक काळज्या, विवंचना याच्यामुळे त्यांनी आपल्या परीघाबाहेरच्या समाजाची दखल सुद्धा घेतली नव्हती. स्वत: मध्येच त्या दंग होत्या. काम करण्यास सुरुवात केल्यामुळे त्यांना घरभेटी कराव्या लागल्या. भेटीदरम्यान अनेक स्त्री–पुरुषांशी त्यांना विविध विषयांवर विचारांची देवाणघेवाण करावी लागली. लोकांपुढचे प्रश्न, त्याची त्यांच्या कुवतीनुसार शोधलेली उत्तरे याचाही विचार करणे गरजेचे झाले. व्यक्ती म्हणून स्वत:चा शोध घेणे त्यांच्या नकळतच सुरु झाले. एकाच समस्येला अनेक पर्याय असू शकतात, हेही त्यांना समजून आले.

अजून एक विशेष म्हणजे या सर्वजणी त्याच गावच्या राहणाऱ्या, त्यामुळे सहजपणे महिलांमध्ये मिसळू शकल्या. उदाहरणच दयायचे झाले तर शिबिरासाठी महिलांना या म्हटले की घराच्या बाहेर पाऊल टाकेपर्यंत घरगुती कामाची प्रत्येकीचीच घाई, मग कुणाची राहिलेली भाकरी पूर्ण कर, कुणाच्या मुलीची वेणी घालून दे, कुणाच्या बाळाला कपडे घाल, अशी कामे या सर्वजणी नेहमीच करत आल्या. महिलांच्या मनात कार्यकर्त्यांबद्दल आपुलकीची भावना निर्माण झाली.

या कार्यकर्त्या मी स्वत: शहाणी, अधिक माहिती असलेली असे कधीही समाजात सांगत फिरल्या नाहीत. 'आम्ही–तुम्ही' ही भाषा न वापरता 'आपण' ही भाषा वापरली, त्यामुळे लोकांच्या अधिक जवळ जाता आले.

कार्यकर्त्यांना दिलेल्या प्रशिक्षणाचा भरपूर उपयोग झाला. प्रशिक्षणामध्ये त्यांना आर्वजून सांगितले होते की लोकांकडे जा, तेही त्यांच्या सवडीच्या वेळी, त्यांचे प्रश्न समजून घ्या, सोडविण्यासाठी कोणते पर्याय असतील याचा विचार करा, तरच त्यांच्याकडून प्रतिसाद चांगला मिळेल. कार्यकर्ती म्हणून त्यांना सगळ्या समस्या सोडवणे शक्य नव्हते; परंतु त्या समस्या सोडविण्यासाठी कोठे जावे, काय करावे याचा योग्य तो सल्ला वेळोवेळी दिला. सुरुवातीच्या काळात मिळणारा प्रतिसाद हा काहीवेळा नकारात्मक सुद्धा होता. एकीने लिहिले आहे की 'ही आहे रिकामटेकडी ,चालली आमच्या बायका नादवायला' असा अनुभव प्रत्येक कार्यकर्तीला नेहमीच येत असतो. असे शेरे मारणाऱ्यांची संख्या सुरुवातीच्या काळात अधिक होती. हळूहळू ही संख्या कमी झाली, कालांतराने हीच माणसे त्यांना मान देऊ लागली.

बऱ्याचशा आजारांविषयी यांना सखोल माहिती दिली गेली. त्यामुळे समाजात सुद्धा त्यांना 'माहितगार' अशा प्रकारचा मान मिळायला लागला.

लोक वैद्यकीय सल्यासाठी यांच्याकडे येऊ लागले. त्यामुळे 'विभक्त राहणे ' किंवा 'नवऱ्यापासून दूर राहणे' हा विषय बाजूला पडला.

ह्या कार्यकर्त्यांनी एड्स या रोगाविषयी स्त्री – पुरुषांमध्ये चांगली जाणीव जागृती केली. हे काम करत असताना अत्यंत खाजगी, मह-त्वाच्या गोष्टी
यांना कळत; परंतु त्याची उघडपणे कुठेही वाच्यता केली नाही. परंतु संबंधित व्यक्तींना औषधोपचार, सल्ला योग्य वेळी मिळण्यास मात्र ह्यांचा हातभार लागला. एड्स कशामुळे होत नाही हे सगळ्यांनाच माहीत असते; पण ते आचरणात आणणे कठीण. कार्यकर्त्यांना घरभेटी करताना त्या गोष्टी स्वत:च्या आचरणातून दुसऱ्यांना पटवून द्याव्या लागल्या. त्यामुळेही लोकांच्या नजरेतून यांचे स्थान उंचावले गेले.

अजून एक मह-त्वाची गोष्ट त्यांनी केली ती म्हणजे माहिती असणारे आणि माहिती नसणारे यांच्यामधील सीमारेषा/अंतर कमी करण्याचा केलेला प्रामाणिक प्रयत्न. जे जे आपल्याला ठाऊक आहे ते दुसऱ्याला सांगणे व यासंबंधी मार्गदर्शन करीत राहाणे. अनेक शासकीय योजनांची माहिती तळा–गाळापर्यंत पाहोचवण्याचे काम त्यांच्याकडून झाले आहे व त्याचा फायदाही अनेक महिलांना मिळाला आहे.

कार्यकर्ती म्हणून त्यांचा वैयक्तिक उत्कर्ष झाला. हे तर आपल्याला तीनही उदाहरणांतून दिसते. त्यामध्ये बौद्धिक, कौटुंबिक, सामाजिक अशा सर्व तऱ्हेचा विकास झाला.

आज समाजातील त्यांची भूमिका एकप्रकारे स्थानिक सल्लागाराची आहे. मग तो सल्ला आरोग्यविषयक असो किंवा सामाजिक असो. लोकांशी बोलताना चर्चा करताना ज्या काही अडचणी येतात त्याची उत्तरे प्रकल्प कार्यालयाशी असलेल्या सततच्या संपर्कामुळे बहुतांशी मिळू शकतात किंवा शोधून काढता येतात व पुन्हा ती महिलांपर्यंत किंवा लोकांपर्यंत पोचविता येतात.

पद्मा मासळकर

जातेगाव खुर्द, शिरुर.

माझे तुटपुंजे शिक्षण, कुटुंबातले वातावरण, माझी राहणी, हे पाहून जर कोणी म्हणाले असते की मी कार्यकर्ती म्हणून चांगले काम करु शकेन, तर माझा स्वत:चा विश्वास बसलाच नसताच; पण गावकऱ्यांनी ते हसण्यावारीच नेले असते. पण काही योगायोग जबरदस्त असतात. तसाच योग माझ्या आयुष्यात आला आणि मी १९९३ साली अनपेक्षितपणे के.ई.एम.रिसर्च सेंटरच्या महिला विकास व आरोग्य या प्रकल्पामध्ये कम्युनिटी वेल्फेअर वर्कर म्हणून कामाला जाऊ लागले. खरं सांगू, मी कोणत्या पदावर काम करते हे सुद्धा तेव्हा मला पटकन् सांगता येत नव्हते. नंतर हळूहळू कामाचे स्वरुप लक्षात येऊ लागले, मी करत असलेल्या कामाचे महत्व ही कळू लागले.

अगदी पहिले प्रशिक्षण होते ते पाच दिवसाचे, काही महिला आधीपासून काम करत होत्या. आम्ही पाच सहा जणीं अगदीच नवीन होतो,

अन् ते चेहऱ्यावरुनच लक्षात येत होते. प्रशिक्षण झाल्यावर आम्हाला काम करण्याबद्दल स्वत:चीच खात्री/विश्वास वाटू लागला. मी सगळ्यांमध्ये लिखाणात कमी पडत होते. कारण सहावीपर्यंत शिक्षण झालेले असले तरी शाळा सोडल्यानंतर १०-१२ वर्षात वही-पेनाशी काही संबंध राहिलेला नव्हता. प्रकल्प अधिकाऱ्यांनी दिलेल्या सततच्या प्रोत्साहनामुळे व माझ्या स्वत:च्या प्रयत्नाने मी हळूहळू त्यामध्ये प्रगती केली.

माझ्याकडे दोन गावांची जबाबदारी देण्यात आली. जातेगाव बु. व जातेगाव खुर्द जे माझे स्वत:चे गावच होते. त्यामुळे तेथे गृहभेटी करुन महिलांना आरोग्य शिबिरासाठी प्रवृत्त करणे, मुलींना शिबिराची माहिती देणे, किरकोळ आजारावर उपचार ही कामे करणे सोपे वाटायचे. पण जातेगाव बु. मध्ये मात्र फारशी ओळख नव्हती. सुरुवातीला काही लोक म्हणायचे "आली रिकामटेकडी, हिला काही काम आहे का नाही? चालली आमच्या बायका नादवायला वगैरे वगैरे...." कुठून सुरुवात करावी, काय बोलावे याचा थोडा संकोच वाटायचा; परंतु फिल्ड सुपरवायझर अनुभवी होते. इतर अधिकारी ही व्यवस्थित मार्गदर्शन करणारे होते. त्यामुळे या गोष्ट जमत गेल्या, महिलांचे शिबिर असले की खूप तयारी करावी लागायची,निदान ५०-६० लोकांना भेटून शिबिरासाठी प्रवृत्त करायला लागायचे.

प्रत्यक्ष शिबिराच्या वेळी मात्र त्यातल्या १५-२० महिलीच पाबळला यायला तयार होत, असं झालं की मी मनोमन निराश होऊन जायची. आपण केलेली मेहनत फुकट गेली असे वाटायचे. काहीवेळा अगदीच ७-८ महिला तयार होत. मग बोलणी पण खावी लागायची. पण असेच काम करीत राहीले. ज्या महिलांशी संपर्क साधलेला असायचा, त्या दुसऱ्या कोणत्यातरी उपक्रमामध्ये आपणहून सहभागी व्हायच्या. म्हणजे केव्हातरी केलेली मेहनत कुठेतरी कामी येते हे अनुभवातून कळू लागले. इतर उपक्रमाबरोबरच मी स्वत: आता १५ बचत गटांवर देखरेख ठेवते. बचतगटाची संख्याही अजून वाढविणार आहे.

महिला शिबिरापेक्षा मुलींना शिबिरासाठी तयार करणे खूपच जिकीरीचे वाटे. मुलींना फक्त माहिती देऊन भागत नसे. त्यासाठी पालक, मुख्याध्यापक, शिक्षक, गावातील प्रतिष्ठीत माणसे यांच्याशी संपर्क साधावा लागे. शिवाय या मुलींना पाबळला नेणे म्हणजे खूप जबाबदारी असल्यासारखे वाटे.

सुरुवातीला महिला मंडळे तयार केली. सकाळच्या वेळात महिलांना अजिबात वेळ नसायचा. मग आम्ही रात्रीच्या बैठका घेत असू. याचाही खूप फायदा झाला.आपल्या सवडीने ही माणसे आपल्याला भेटायला येतात हे पाहून महिलांनाही बरे वाटले. मंडळातर्फे आम्ही महिला समृद्धी योजना, पोस्टाची बचत योजना, वगैरे उपक्रम राबविले. महिलांनी पण आम्हाला चांगली साथ दिली. विविध उपक्रम सुरु केल्यामुळे जातेगाव खुर्द मधील प्रगती महिला मंडळास पंचायत समिती शिरुर तर्फे दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस २०००/- रुपये व प्रशस्तीपत्र मिळाले. आमच्याच प्रकल्पामधील तीन महिला मंडळांना ओळीने बक्षीसे मिळाली. आम्हा सर्वांचाच ऊर तेव्हा आनंदाने भरुन आला.

इतक्या वर्षामध्ये अनेक कडू-गोड अनुभव घेतले. ज्या गावात मला सुरुवातीला उत्तम प्रतिसाद मिळाला, त्याच गावात राजकारणामुळे सर्व वातावरण

बदलले. प्रत्यक्ष गावठाणात मिळणारा प्रतिसाद काही काळासाठी थंडावला. त्यावेळी मला स्वत:बद्दल चीड आली. मी हे काम कशासाठी करते? असा प्रश्न मीच मला विचारु लागले. पण आज त्यामुळे झालेले फायदे माझ्यासमोर उभे राहतात. गावातून प्रतिसाद कमी मिळतो आहे असे लक्षात आल्यावर साहजिकच मी माझे लक्ष दुसऱ्या गावच्या निरनिराळ्या वस्त्यांकडे वळवले. तेथील घरे विखुरलेली होती. मला अधिक मेहनत पडत होती. पण काम समाधानकारक होत होते.

महिलांची शिबिरे, बचतगट, परसबागा, या सर्वच बाबतीत मी इतरांपेक्षा पुढे गेले. त्यानंतरचे पुढचे पाऊल म्हणजे बचतगटाची स्थापना. बचतगटाची संकल्पना जेव्हा महिलांपुढे मांडण्यात आली तेव्हा त्या लवकर तयार होईनात; पण हळूहळू त्यांचा यावर विश्वास बसू लागला.

विशेष उल्लेख करावासा वाटतो तो हरीजन वस्तीचा. घरभेटीतूनच त्यांनाही प्रकल्पाचे उपक्रम समजावून सांगितले, पण त्याचबरोबर त्यांची सुख–दु:खे अडीअडचणी समजावून घेतल्या, त्यामुळे आपुलकी वाढली. वस्तीवर निर्मलाच्या रुपाने खंबीर नेतृत्वही मिळाले. त्यामुळे तिथे चांगल्या तऱ्हेचे महिला मंडळ तसेच बचत गट उभे राहू शकले. बचत गटातून जी जवळीक निर्माण झाली त्यामुळे अडीअडचणीच्या प्रसंगात सगळ्याच एकमेकीला शारीरिक, भावनिक, आर्थिक आधार देतात.

हे सर्व उपक्रम करीत असताना प्रकल्पातर्फे विविध तऱ्हेच्या प्रशिक्षणातून खूप माहिती देण्यात आली. आमच्यातील कौशल्ये वाढवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. गेल्या वर्षी आमच्या प्रकल्पातील कर्मचारी, अधिकारी सर्वांनी मिळून लॉ कॉलेजचा एक कायदा साक्षरता विषयक कोर्स पूर्ण केला.खरं सांगायचं तर कायद्याची, पोलीस स्टेशनची माहिती मिळाल्यामुळे मला पोलीस स्टेशनची भीती वाटेनाशी झाली. काही वेळा तरुण मुले वेडी–वाकडी वागताना दिसली की मीच त्यांना आता पोलीस स्टेशनचा धाक दाखविते. विविध कायदेविषयक अडचणींसाठीही आम्ही थोडे थोडे मार्गदर्शन करु लागलो आहोत.

आज मागे वळून पाहिले की माझे मलाच आश्चर्य वाटते. माझे घर, नातलग, यापलीकडचे जग मी कधी जाणून घेतले नव्हते. सासरी आल्यावर एकंदर वातावरण असे होते की मी सतत भांडायची, माझ्यावर, माझ्या नवऱ्यावर अन्याय होऊ नये म्हणून झगडायची, त्यामुळे माझ्यावर भांडखोर असा शिक्का बसला होता. गावात सुद्धा माझ्या नादी कोणीच लागत नसे. माझे राहणीमानही अगदी अव्यवस्थित, कोणाशी कसे वागावे, कसे बोलावे, याची समज जरा कमी होती असे म्हणा ना ! आता मात्र माझ्यात खूप बदल झालाय. समाजात वावरताना त्यांना काही गोष्टी समजावून सांगताना आपण स्वत: शांत व संयमी असायला हवे हे कळू लागले. विचारपूर्वक बोलण्याची सवय लागली.

राहणीमानात बदल झाला. समाजात मला प्रतिष्ठा मिळाली. गेल्या तीन चार वर्षांपासून लोक मला स्वत:हून भेटायला येतात. आरोग्याविषयी, कुटुंबाविषयी अडचणी सांगतात. माझ्याकडून योग्य सल्ला मिळेल अशी अपेक्षा करतात. ग्रामसेवक, सरपंच मला विविध उपक्रमामध्ये सहभागी करुन घेतात. लैंगिक आजार, एच.आय.व्ही चे पेशंट याविषयीही मी महिलांना सविस्तर माहिती सांगू

शकते व त्यांना कोणत्या दवाखान्यात जायचे त्याचा सल्ला देते.

प्रकल्पात काम केल्यामुळे मला माझी कौटुंबिक, आर्थिक स्थिती सुधारता आली. गेल्या वर्षीच मुलाचे लग्न केले. एक मुलगा मंदबुद्धी आहे, पण तो शेतातील कामे, पाणी आणणे वगैरे कामे उत्तम रीतीने करतो. माझे घरातील– कुटुंबातील स्थान निश्चितपणे उंचावले आहे. जे दीर, नणंदा, मला कोणत्याच कौटुंबिक निर्णयात सहभागी करत नव्हते, ते माझा सल्ला घ्यायला येतात.

●●

सुमन सीताराम पवार

माझं नाव सुमन पवार. शाळा सोडली तेव्हा सातवी पास झाले होते. मला भाऊ नाही. वडील पाचवी पर्यंत शिकलेले. आई निरक्षर. मला एकंदरीत चार बहिणी , माझ्या पेक्षा दोन मोठया आणि दोन लहान, माझा नंबर तिसरा. चारही बहिणींची लग्ने झाली आहेत. त्यांचा संसार सुखाने चालू आहे. आमच्या समाजात दारिद्र्य मागासलेपणा व अंधश्रद्धा पाचवीला पुजलेल्या.

या सर्वामध्ये आणखी भर असते ती व्यसनाची. परंतु आमचे कुटुंब तसे नशिबवानच; आमच्या वडिलांना साधे सुपारीचे सुद्धा व्यसन नाही. थोरल्या दोन्ही बहिणींचे शिक्षण झालेले नाही; परंतु माझ्या पाठच्या दोन्हीही बहिणी ११ वी पर्यंत शिकलेल्या आहेत. आमच्या वडिलांनी नातेवाईकांच्या मदतीची अपेक्षा न ठेवता, स्वतः काबाडकष्ट करुन मला व बहिणींना शिक्षण दिले. वडिलांना ७ एकर जमीन आहे. ती जिरायती असल्याने नेहमी पडीकच असे. त्यातून मिळणारे उत्पन्न बेताचे.

मी सातवीची परीक्षा दिली. वय होते जेमतेम चौदा वर्षे पूर्ण आणि माझे लग्न झाले. शिरुर तालुक्याच्या पूर्व भागात गुनाट या गावी माझे सासर. मुलगा नोकरीला आहे. पुण्यात राहावयास जागा आहे, सुस्वभावी आहे, असे सर्व चुकीचे सांगून आमची फसवणूक केली. लग्नानंतर लगेच त्याने आपले खरे रुप दाखवायला सुरुवात केली. सतत काही ना काही मागणी करु लागला. रिक्षा विकत घेऊन द्या असे म्हणू लागला. 'हे द्या ते द्या' चालू झाले, त्यातच भर म्हणून तो दारु पिणे व इतर व्यसने करु लागला. मी वयाने लहान होते तरीही वडिलांनी कर्ज काढून अंगठी, घडयाळ देऊन थाटामाटात लग्न करुन दिले, याची मला जाणीव होती.

दीड दोन महिन्याने मी माहेरी आले ते परत गेलेच नाही . परत जाण्यासाठी कोणी प्रवृत्त केले नाही. मीही कोणाचे ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. मी जणू स्वत:ला कोंडून घेतले होते. आमचे घर गावाच्या एका टोकाला, त्यामुळे कोणाबरोबर मिसळत नव्हते. गावात कोणाशी ओळख नव्हती. स्वभाव पहिल्यापासून भित्रा. सतत कोणत्याही गोष्टीचे दडपण मनावर येत होते. यावर मार्ग म्हणून बाहेरुन परीक्षा देऊन दहावी पास झाले. मधल्या काळात शिवणकामाचा दोन महिन्यांचा कोर्स केला. वडिलांनी मशिन घेऊन दिली. प्रॅक्टीस करता करता थोडेफार पैसे मिळत होते. वर्तमानपत्राच्या जाहिरातीवरुन सहा महिन्यांचा निवासी गृहपरिचारिका (दाई) कोर्स पुणे येथे पूर्ण केला. माझ्या स्वत:च्या दु:खातून बाहेर येऊ लागले.

गृहपरिचारिका कोर्स करुन गावात आले . याच कालावधीमध्ये महिला आरोग्य व विकास प्रशिक्षण केंद्र, पाबळ (मार्च १९९३) येथे महिला कार्यकर्ती म्हणून माझी सविंदणे गावासाठी नेमणूक झाली आणि माझ्या जीवनाला पूर्ण कलाटणी मिळाली. जीवन उजळून निघायला सुरुवात झाली. आम्हाला पहिलेच काम दिले होते ते सर्वेक्षणाचे. हे सर्वेक्षण करीत असताना माझा स्वत:कडे बघण्याचा दृष्टिकोन, स्वत:ला कमी लेखण्याचा दृष्टिकोन बदलू लागला. आधी मला वाटे नवऱ्यापासून विभक्त राहणारी मी एकटीच. माझ्याएवढे दु:ख कोणालाच नाही.

घरोघरी फिरल्यावर लक्षात आले की आपल्या गावातच अशा अनेक स्त्रिया आहेत. शिवाय त्यांना कुठलाच आधार ही नाही. मला माझी अशी माणसे तरी होती. माझा आत्मविश्वास वाढला. मी माझे काम पुढेही चालू ठेवले. आज मी एस.वाय.बी.ए.ची परीक्षा देत आहे. मला नोकरी मिळाल्यामुळे कुटुंबामध्येही बदल घडून आला. धाकटया दोन्ही बहिणींचे शिक्षण तर झालेच शिवाय, त्यांच्या लग्नास योग्य मुलाची निवड करताना खूपच फायदा झाला. शिवाय थोरल्या बहिणींना सुद्धा कुटुंब नियोजनाबद्दल प्रसंगी त्यांच्या नातेवाईकांचा रोष ओढवून घेऊन एक आणि दोन मुलानंतर ताबडतोब शस्त्रक्रिया करवून घेण्यास भाग पाडले.

आमच्या प्रकल्पामध्ये किशोरी विकास केंद्र, म्हणजे ७–११ वयोगटातील मुलींसाठी केंद्रे चालवली जातात. मला या उपक्रमाचे खूप महत्व व कौतुक वाटते. खरोखरीच इतक्या लहानपणी जर आरोग्यविषयक चांगले संस्कार झाले तर भविष्यात त्यांना ते खूपच उपयोगी पडू शकतील. मी हा उपक्रम दरवर्षी अतिशय उत्साहाने राबविला. या एका उपक्रमासाठी मला प्रकल्पातर्फे सतत तीन वर्षे बक्षिस सुद्धा मिळाले आहे.

सी. डब्ल्यू. डब्ल्यू.म्हणून काम करताना सुरवातीस खूप त्रास झाला. लोक निंदा करत होते, गावातील चांडाळ चौकडी अपमान करण्याची संधी सोडत नव्हती. एका बाजूने प्रतिष्ठा दुसऱ्या बाजूने निंदा चालूच होती. लग्नानंतर माहेरी राहात होते, त्यामुळे ''आमच्या मुलांची मुले लग्नाला आली तरी तशीच फिरते.''अशी सुद्धा नावे ठेवत होते. माझा विकास/उत्कर्ष होऊ लागल्याने काही ना काही आरोप करण्यासाठी पुढे सरसावत होते. परंतु सत्य खूप वेळ दडून राहात नाही.

प्रगती व काम यामध्ये सामाजिक स्थान व प्रतिष्ठा वाढतच होती. आज गावात मुलींची लग्न ठरविताना बोलवितात, बस्ता घेताना बोलवतात. माझ्या आवडीने खरेदी करतात. मुली व महिला आणि काही वेळा पुरुष सुद्धा स्वत:च्या खाजगी गोष्टी येऊन सांगतात. समस्या मांडतात. मन मोकळे करतात. नातेवाईक सुद्धा माझ्याशी प्रेमाने वागतात. मी सुद्धा सर्वांच्या सुख:दुखाच्या क्षणी त्यांच्या बरोबर राहण्याचा प्रयत्न करते.

माझ्यावर असणारे संस्कार आणि महिला आरोग्य व विकास प्रशिक्षण केंद्रातील सर्व सहकारी यांचे मार्गदर्शन, प्रेम व आपुलकीमुळे ऐन तारुण्यामध्ये मी कुठेही फसले नाही. कोणाचेही आकर्षण वाटले नाही, माझ्याकडे पैसा व स्वातंत्र होते. धाक दाखवायला कोणी नव्हते परंतु अशी दुर्बुद्धी कधी सुचली नाही.

सी. डब्ल्यू. डब्ल्यू.म्हणून मी मनापासून

काम केले. ग्रामपंचायत, इतर गावकरी यांच्या संपर्कात राहिले. त्यामुळेच आमच्या गावात जेव्हा दोन वर्षापूर्वी अंगणवाडी सुरु झाली तेव्हा मला संधी देण्यात आली. मी आता एक सक्षम अंगणवाडी कार्यकर्ती म्हणून काम करीत आहे. अंगणवाडी शिक्षिका म्हणून नोकरी मिळाल्यावर सी. डब्ल्यू. डब्ल्यू.म्हणून काम करताना तारांबळ होऊ लागली. दोन्हींची सांगड घालता येत नव्हती. म्हणून सी. डब्ल्यु. डब्ल्यु. च्या कामाचा राजीनामा दिला; परंतु प्रकल्पाचा मला खूपच आदर व आधार असल्याने आज माझ्याशी त्यांचे संबंध पूर्वीप्रमाणे चांगले आहेत. कारण मला घडवण्यामध्ये जास्तीत जास्त श्रेय हे पाबळ प्रशिक्षण केंद्राचेच आहे. सध्या मी अंगणवाडीचे काम प्रामाणिकपणे करुन सविंदणे गावातील प्रत्येक सार्वजनिक उपक्रमामध्ये सहभागी होत असते. घरचे शेतीचे नियोजन, शिलाई काम, यामधून दरमहा तीन हजार रु. उत्पन्न सहज कमविते.

आज मी प्रत्येक काम अत्यंत आत्मविश्वासाने करु लागले आहे. ज्यावेळी अडचण व भीती वाटते त्यावेळी प्रकल्पाच्या अधिकारी वर्गाला भेटते. त्यांच्या मदतीशिवाय आजही काही काम करत नाही. प्रकल्पासाठी नवीन नेमलेल्या कार्यकर्तीला मी आजही विविध उपक्रमांमध्ये मदत करते. कारण म.आ.व.वि. प्रकल्पाचे काम हे खूप महत्वाचे व गरजेचे आहे, असे मला मनापासून वाटते आणि त्यामुळेच आज मला सविंदणे गावामध्ये विविध कामे करण्यासाठी प्रोत्साहन मिळते आहे. त्यासाठी माझ्या ग्रामस्थांनीही मला आतापर्यंत पुढील दिलेल्या संधी व प्रोत्साहन फार मोलाचे आहे.

१. जिल्हा परिषद पुणे तर्फे आदर्श महिला मंडळ पुरस्कार मिळाला.
२. ग्रा. पं. सविंदणे येथे ग्रामशिक्षक समितीवर सदस्य म्हणून निवड झालेली आहे.
३. अंगणवाडी संनियंत्रण समिती सविंदणे येथे सदस्य म्हणून निवड .
४. दोन वेळा सी. ई .ओ.जि.प.पुणे यांचे हस्ते कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया कार्यक्रमात सहभागी झाल्याबद्दल सत्कार व प्रशस्तीपत्र मिळाले.
५. प्राथमिक आरोग्य केंद्र, कवठे, ग्रामपंचायत सविंदणे या ठिकाणी मानाची वागणूक मिळते.
६. अंगणवाडी शिक्षिका म्हणून नोकरी मिळाली.
७. प्रत्येक सार्वजनिक कार्यक्रमामध्ये माझा सक्रीय सहभाग असतो. अगदी लोकांना बोलवणे, रांगोळी काढणे हे सुद्धा मी पाहाते.

●●

सुशिला सोनवणे

मी सुशिला. प्रकल्पामधील एक कार्यकर्ती. केंदूर माझं गाव. जन्म तिथलाच. नियतीने वडिलांचे मायेचे छत्र लहानपणीच हिरावून घेतले. त्यावेळी काही कळत नव्हते. लहानपणापासूनच दु:खे व संकटे यांना तोंड देत जीवनचक्र सुरु झाले. आई गावात झाडलोट करायची. हीन दीन, लाचारीचे जीवन जगणारं आमचं कुटुंब होतं. आर्थिक, सामाजिक, राजकीय कोणत्याही स्वरुपाचे पाठबळ नसलेलं आमचं मागासवर्गीय कुटुंब खरोखरच मागासवर्गीय होतं. कसे तरी रडत खडत १० वी पर्यंत शिक्षण झालं. त्यातही नापास झाले व आई लगेच लग्नाच्या गोष्टी करु लागली. तेव्हा आम्हा

१६ वर्षाच्या मुलींना या विषयावर बोलण्यासारखे काहीही कळत नव्हते. आईने चौकशी केली आणि पाबळ येथील मुलाबरोबर लग्न ठरविले. अन् २२.६.१९८० मी गृहस्थाश्रमात प्रवेश केला व माझा जीवनाचा प्रवास बळिराम बरोबर सुरु झाला. लग्नानंतरच्या सुखद प्रवासातून माझी जीवन नौका चालली होती.

लग्न झाले त्यावेळी माझे पतिराज घरीच होते. १९८४ ला ते मुंबईला गेले आणि तेथे त्यांना चांगल्या मोठया शासकीय दवाखान्यात नोकरी मिळाली (सायन हॉस्पीटल, मुंबई). मी मुंबईला गेले. आमचा संसार सुखाचा चालला होता. त्यांचेकडे जी काही ४–५ वर्षे राहीले त्याच काळात एक कन्यारत्न झाले. तिच्या लालनपालनामध्ये माझे दिवस मजेत जात होते. पण नियतीने माझ्या संसारावर घाला घातला, अन् माझा सुंदर संसार पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोलमडून पडला. नवऱ्याचे एका बाईबरोबर प्रेम जडले अन् त्याने रखेली म्हणून तिचा स्वीकार केला. माझे कोवळे मन व कोवळे शरीर कोमेजून गेले. वडील १९७२ लाच देवाघरी गेले होते. जीवनात सगळा अंध:कार पसरला. काय करावे सुचेना. मी माहेरचा रस्ता धरला तो कायमचाच निर्धार करुन, परत मुंबईचे तोंड पहायचे नाही असे ठरवून, आजतागायत मी माहेरीच राहाते.

जे माझ्या जीवनात घडले तेच माझ्या पाठच्या बहिणीच्या बाबतीत पण घडले. तिलाही दोन मुले झाली. ती पण नवऱ्यापासून विभक्त झाली. आम्ही दोघी आईकडे आलो. आई झाडूचा व्यवसाय करत होती. तिने कसेतरी चिकाटीने आमचे शिक्षण करुन लग्न लावून दिले होते व थोडया वर्षामध्येच परत आम्ही कायमच्याच माहेरी आलो ते आजतागायत. न जाणो आईचे जीवन सुखकर जाण्यासाठी नियतीने आम्हाला परत बोलावले असेल, म्हणून आमचे संसार उध्वस्त झाले असतील.

वयाची पंचविशी ओलांडण्याचे वेळी १०.३.८९ मध्ये एक कायमची लक्षात राहणारी घटना घडली. आमच्या गावात ग्रामपंचायत बोर्डावर 'के.ई.एम.रुग्णालय संशोधन केंद्राच्या युवती आरोग्य व विकास प्रकल्पासाठी कम्युनिटी वेल्फेअर वर्करची जागा भरावयाची आहे' अशी जाहिरात वाचली. मी अर्ज केला व माझी ३०० रु. मानधनावर निवड झाली. आज मला ८०० रु. मानधन मिळते. खरा जीवनप्रवास येथूनच सुरु झाला. समाजाचा अभ्यास, लोकांचा अभ्यास करायला संधी मिळू लागली. समाजात किती चांगले लोक असतात. तसेच किती वाईटही असतात हे लक्षात येऊ लागले. समाजामधील लोकांच्या विविध तऱ्हा लक्षात येऊ लागल्या. आपली स्थिती इतरांपेक्षा खूपच चांगली आहे असे वाटू लागले. महिलांच्या अडचणी, त्यांची दु:खे समजावून घेता येऊ लागली.

प्रकल्प अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने व प्रोत्साहनाने मी भित्री बाई पोटगी साठी कोर्टात जाऊ लागले. माझा आत्मविश्वास वाढू लागला. आव्हाने पेलण्याची ताकद अंगात संचारु लागली. नवऱ्याकडून सुरुवातीला २०० रु. इंटेरीम पोटगी १९९३ सालापर्यंत मिळाली. मी परत अर्ज करुन एकरकमी पोटगी द्यावी अशी मागणी केली. त्यावेळी मला ३०,०००/– रु. मिळाले. ज्या दिवशी माझ्या नातेवाईकांना मला पैसे मिळणार हे कळले तसे माझे सख्खे मामा मामी पैशासाठी माझ्या मागे लागले. मी पैसे देणार नाही असे सांगूनही ते ऐकेना. शेवटी प्रत्यक्षात ज्या दिवशी पैसे हातात आले त्यादिवशी

प्रकल्प अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार ताबडतोब बँकेत पैसे गुंतवले व मगच घरी आले. त्यामुळे नातेवाईकांना समजून चुकले की सुशिला आता हुशार झाली. तिला योग्य सल्ला मिळू लागला. पुन्हा १९९७ साली केस लावली. त्यावेळी २७,०००/– रु. मिळाले. हे २७,०००/– रु. मुलीच्या शिक्षणासाठी मिळाले होते. ३०,०००/– पैकी अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने १५,०००/– बँकेत स्वतःच्या नावे मुदत ठेवीमध्ये गुंतवले. उरलेले पैसे वडिलांचे जुने घर सुधारण्यासाठी खर्च केले. अजूनही केस चालू आहे. परत नवऱ्यावर जमिनीत हिस्सा मिळावा म्हणून केस लावणार आहे.

नोकरी मिळाल्यानंतर थोडा पैसा हातात येऊ लागला पण तेवढया पगारात आम्ही तिघी जणी व तीन मुले यांचे भागत नव्हते, म्हणून मी व्यवसायात पडण्याचा विचार केला. पुन्हा प्रकल्पाधिकाऱ्यांनी प्रोत्साहन दिले व मी शिलाई कोर्स करू लागले. त्यासाठी मी केंदुरवरुन पाबळला पायी ८ कि.मी. येऊ–जाऊ लागले. कशाचीही तमा न बाळगता मी सातत्याने ३ महिने हा प्रवास करून कोर्स पूर्ण केला. या काळातील अनुभवातून जिद्द व चिकाटी वाढली.

कोर्स पूर्ण झाला पण मशीन कोठून आणायची? हा प्रश्न पडला, पंचायत समिती शिरूर मार्फत मागासवर्गीय महिलांना सबसीडीवर मशीन मिळते हे पाबळ प्रकल्पात काम करत असताना समजले व अर्ज करुन सेंटरच्या सहकार्यातून मला मशीन मिळाली. सकाळी प्रकल्पाचे काम, दुपारी शिवण काम. माझी आर्थिक अडचण कमी होऊ लागली आम्ही पाच महिलांनी एकत्र येऊन 'महिला शिवण केंद्र' सुरू केले. के.ई.एम.रुग्णालय पुणे साठी लागणारे कपडे आम्हास शिवण्यासाठी प्रकल्पामार्फत मिळू लागले. प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे व पाठिंब्यामुळे हे सर्व शक्य होत होते.

तरीसुध्दा पैशाची चणचण वाटत होती. कितीही मिळाले तरी कमीच पडते या उक्तीप्रमाणे गरजा वाढू लागल्या. मुले मोठी होत होती तसतसा खर्च वाढत होता. त्यातच आईच्या आजारासाठी पैसा खर्च होऊ लागला, जोडीला आणखी काही तरी करावे हा विचार मनात आला व मी बांगडी व्यवसाय सुरू केला. माझ्या भोळया स्वभावामुळे व व्यवसायाचे तंत्र माहीत नसल्यामुळे उधारी वाढत गेली त्यामुळे तो व्यवसाय मी वर्षभरात बंद केला.

स्त्रियांच्या मूळ गुणधर्मात सतत नवीन काहीतरी करत राहण्याची दृष्टी असते त्यानुसार महिला आरोग्य व विकास प्रशिक्षण केंद्राकडे अर्ज करून पिको –फॉल मशिनसाठी कर्ज मिळविले. ५००० रु ची मशिन घेतली त्याचबरोबर पाबळ येथे जाऊन 'फॅशनेबल ब्लाऊज' चा कोर्स पूर्ण केला. व्यवसाय चांगला सुरू आहे कर्जफेड पूर्ण केली आहे.

या सर्व गोष्टींमधून नवनिर्माण करण्याची गोडी वाढत गेली. त्यातूनच स्टॉल/टपरी घेण्याची कल्पना पुढे आली. टपरी तयार करुन घेतली. माझे घर प्राथमिक शाळेसमोरच असल्यामुळे शालेय वस्तू, गोळ्या, बिस्किटे, पेप्सी, सौंदर्य प्रसाधने इ. साधनांची मी विक्री करु लागले. सोबत बहिणीची व मुलांची साथ होतीच. टपरीचे काम मी आता बहिणीवर सोपवले आहे. मला टपरीसाठी समाज कल्याण खात्याकडून मदत मिळाली. किराणा दुकान करण्याचा नव संकल्प केला व एक गाळा घराशेजारीच तयार केला. बचत गटातून कर्जरुपाने पैसे घेऊन बांधकाम केले त्यामध्ये किराणा दुकान सुरु केले,

फ्रिज घेतला. त्यामध्ये पेप्सीचा खप मोठया प्रमाणात होतो. आज माझ्याकडे पाबळ सेंटरची नोकरी आहे. सोबतीला टपरी, थंडा विक्री, किराणा दुकान, शिवणकाम इ. व्यवसाय असून ते सर्व व्यवसाय चांगल्या पद्धतीने सुरु आहेत. मला बचत गटातूनसुद्धा भरपूर फायदा झाला. बचत गटाच्या वेळोवेळीच्या प्रशिक्षणातून हिंमत, चिकाटी वाढली. बोलण्याची हिंमत वाढली. आमचा गट दारिद्र्य रेषेखालील असल्यामुळे योजनेतून किराणा दुकानासाठी २५,०००/- रु. मिळाले. त्यामध्ये १०,०००/- अनुदान मिळाले.

मध्यंतरीच्या काळात माझी एकुलती एक लाडात वाढलेली मुलगी, तिचे लग्न १३.३.२००२ ला झाले. तिला ढोक सांगवी, ता. शिरुर येथे दिले. जावई व्हिल रेडिओ कंपनीत नोकरीला आहे. आता तिलाही मुलगा झाला आहे, ती अगदी सुखात आहे.

मी माझ्या सर्व व्यवसायात यशस्वी होत गेले. त्याचे रहस्य म्हणजे पाबळ सेंटरची मदत व तेथून सतत मिळालेले मार्गदर्शन व सहकार्य होय. त्याचबरोबर बचत गटातून माझ्यामध्ये जिद्द, चिकाटी निर्माण झाली, आपल्याला काहीतरी करायलाच हवे. दुसरे उपजिविकेचे साधन उपलब्ध नाही. सर्वस्वी आपण या व्यवसायावरच अवलंबून आहे. नोकरीमध्ये माझा ८ ते ११ हा वेळ जातो. उरलेला वेळ मी व्यवसायाला देते. आता मी सुखी आहे. सर्व खर्च जाता २ ते ३ हजार रु. मला दरमहा आरामशीर मिळतात. आज मी खऱ्या अर्थाने सक्षम महिला बनले, याचा आनंद मला सतत मिळत आहे.

आतापर्यंत मी शिवण, मेणपणती, आकाशकंदील, रांगोळी, विणकाम, भरतकाम, उदबत्ती तयार करणे, बास्केट व फ्लॉवर पॉट करणे इ. कोर्स पूर्ण केले. तसेच बचत गट व नर्सरीचे प्रशिक्षण घेतले. या सर्व प्रशिक्षणामधून माझ्यातला आत्मविश्वास वाढला. स्वभाव शांत झाला. समाजाचा अभ्यास झाला, जिद्द वाढली.

सुरुवातीला के.ई.एम. पाबळला काम करु लागल्यावर मला बौद्ध असल्यामुळे फार त्रास झाला. सर्वसामान्य बौद्धांना जी भेदभावाची वागणूक देतात तशी वागणुक मला गावातून मिळाली. लोक मला पाहून तोंडे वाकडी करायचे. वाड्यावस्त्यांवर मला लोकांकडून म्हणावी तेवढी वाईट वागणूक मिळाली नाही; पण गावामधून हा त्रास झाला. एकदा मला एक प्रसंग आठवतो. प्रकल्पप्रमुखांबरोबर मी गावात गृहभेटी करत होते. एका घरी आम्हास चहा देण्यात आला. प्रमुखांना मिळाला घरातल्या कपामध्ये आणि मला मिळाला बाहेरच्या देवळीत ठेवलेल्या कपामध्ये.

अर्थात मला हे फारसे नवीन नव्हते किंवा त्याबद्दल मी कोणाशी बोलले नाही; पण प्रकल्पप्रमुखांच्या ते लक्षात आल्याशिवाय राहिले नाही. आता खूप बदल झाला आहे आणि गावात आता तेवढा विरोध राहिला नाही. ग्रामपंचायतीमार्फत ग्राम शिक्षण समिती स्थापन करण्यात येते, त्या समितीवर मला सदस्य म्हणून घेण्यात आलेले आहे. म्हणूनच म्हणते आता पूर्वीचा विरोध राहिलेला नाही.

मी जे काही उपक्रम करत गेले त्याचे लोकांनी कौतुक केले. कोणी विरोध केला नाही. बाई म्हणून मला कोणत्याही प्रकारचा त्रास झाला नाही. वाकडया नजरेने कोणी पाहिले नाही. माझे दुकान माझ्याच खाजगी जागेवर असल्यामुळे त्रास झाला नाही.

भाडयाचे ठिकाण असते तर एखादेवेळी त्रास झाला असता . मी बौध्द जातीची असूनसुध्दा मला लोकांनी त्रास दिला नाही. नोकरी निमित्ताने मी अनेक उच्च कुटुंबात फिरले. सर्वांनी मला स्वीकारले. त्याचे कारण माझा दृष्टिकोन सकारात्मक आहे व मी कुणाची टीका करत नाही. सर्वांशी मिळून मिसळून वागते कोणाशीही तक्रार भांडण नाही.

माझे बरेच ग्राहक लहान मुलेच आहेत. ते निरागस असतात. महिला व मुली पण ग्राहक आहेत. त्यांना मी दुकानदार म्हणून कधीच फसवत नाही. गावातील लोक आम्हा कुटुंबियांना आता पैसेवाले समजतात. घरात पुरुष नाही. बहिणीचा एक मुलगा आहे . व्यसनी कोणीही नाही. त्यामुळे पैसा वाढत गेला व आत्मविश्वास वाढला. आम्ही काहीही करु शकतो हा विश्वास निर्माण झाला. गावातील पुढाऱ्यांचे मला पूर्ण सहकार्य आहे. बँकेत चांगली पत निर्माण झाली आहे. आता मला परिसरातील महिला मार्गदर्शनासाठी बोलवतात. माझा स्वभाव मोकळा आहे. मी सर्वांशी प्रेमाने वागते.

कामामुळे माझ्या ज्ञानात भर पडत गेली व अनुभव मिळत गेला. आज मी पूर्णपणे समाधानी आहे. वैयक्तिक जीवन कौटुंबिक जीवन व मुलांचे शिक्षण ह्यात मी प्रगती करु शकले . खडतर जीवनाच्या पायऱ्या चढत चढत आज मी यशाच्या शिखरावर उभी आहे. अनेकांना हात देत आहे. प्रकल्पाचे काम करताना मला लोकांचे/ महिलांचे सहकार्य का व कसे मिळाले याचा विचार करताना लक्षात येते की माझा मनमिळाऊ स्वभाव, कोणाचीही वैयक्तिक न्यूनता किंवा उणी– दुणी न काढणे, जी काही माहिती मिळेल त्याची चार लोकांत चर्चा न करणे.

माझी कहाणी एवढया सविस्तरपणे सांगण्याचे कारण असे की माझ्यासारख्या परित्यक्तेला एक कार्यकर्ती म्हणून जे मार्गदर्शन मिळाले किंवा जो आधार मिळाला त्यामुळे मी एकटीच अन्यायाविरुद्ध उभी राहिले असे नाही, तर आमच्या गावातील कितीतरी घटस्फोटीत विधवा, परित्यक्त्या स्त्रियांना मी योग्य तो सल्ला दिला आहे व पुढेही देणार आहे. आता तर आम्ही कायदेविषयक माहिती अधिक प्रमाणात करुन घेतली आहे. त्यामुळे अशा तऱ्हेचा सल्ला देणे अधिक सुकर झाले आहे.

●●

३

महिला स्वावलंबन

आरोग्य आणि विकास प्रकल्पांतर्गत आरोग्य शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, महिला स्वावलंबन व अल्प बचत गट या उपक्रमांमुळे ज्यांच्या आयुष्यात काहीतरी बदल होऊ शकले, अशा काही प्रतिनिधिक यशोगामिनींची महिती येथे देत आहोत.

आयुष्यातील एका विशिष्ट टप्प्यांवर असताना या महिलांना प्रकल्पाची साथ मिळाली आणि त्यांच्या वैयक्तिक व कौटुंबिक जीवनामध्ये थोडेफार बदल घडून आले. अथक परिश्रम व चिकाटी हा स्त्रियांचा स्थायीभाव असतो. फक्त त्या कष्टांना योग्य दिशा व मार्गदर्शन आवश्यक असते.

खाली दिलेले काही अनुभव म्हणजे प्रत्येकीने आपल्या कुवतीनुसार व्यवसायांची केलेली निवड व एकातून दुसरा व दुसऱ्यातून तिसरा अशी केलेली यशस्वी गुंफण आहे. हेच अनुभव कार्यकर्यांना प्रेरक व मार्गदर्शक ठरू शकतात.

तपाबाई

अतिशय खडतर अशी जीवनाची सुरुवात झाली व तपाबाई हे नाव सार्थ करण्याचे नशिबी आले. माझे माहेर आणि सासर हेच. लहानपणी नाही म्हणायला शाळेत गेले; पण तिसरीतूनच शिक्षण सोडले व जनावरांच्या मागे जायला लागले. असं म्हणतात की तप करणे म्हणजे झिजणे. मी मला कळायला लागल्यापासून आजपर्यंत तेच करत आले. माझा आवडता देव पांडुरंग, त्यावर अढळ श्रद्धा आहे. पंढरीच्या वाऱ्या साधारण ५-६ वेळा केलेल्या आहेत. आयुष्यात एकदा का होईना मला काशीला जाण्याची संधी मिळाली हे माझं सद्भाग्य ! आज मी साठी गाठली आहे.

मला आठवतं माझं लग्न वयाच्या चौदाव्या वर्षी म्हणजे पोरवयातच अगदी साधेपणानं झाले. नवरा चौथी पर्यंत शिकलेला. तेव्हा बरीचशी कुटुंबं ही एकत्र पद्धतीची असत, आमचंही त्यातलंच एक. कुटुंबाचा मुख्य व्यवसाय शेतीच आणि तीही पावसावरच अवलंबून.

मला ६ मुले झाली, त्या काळाला शोभेशीच. त्यातल्या ३ मुली होत्या व ३ मुलगे होते. त्यापैकी दोन मुली व एक मुलगा ७-८ वर्षाच्या वयातच वारला. माझ्या मुलीला मी शिकवले ते तिसरीपर्यंतच. मुलांना जास्त शिकवावे असे वाटत होते, पण दोन्ही मुले ९ वी च्या पुढे शिकली नाहीत. दोघेही ड्रायव्हर काम करतात. एकाचे लग्न झाले. त्याला दोन मुली व एक मुलगा आहे. वंशाला दिवा हा हवाच ना ! इथपर्यंतची कहाणी इतर बायांची असते तीच.

पाबळ केंद्रामध्ये मी पहिल्यांदा गेले ते बघा ९३ साली. मग हळूहळू जरा वेगळ्याच वाटेने जात राहिले. साधारण वर्षभरात एकत्र भेटून चर्चा करत, बैठका घेत, हळूहळू महिला मंडळ तयार

झाले आणि त्याची नोंदणी की काय करतात ना ते पण केले. महिलांनीच मला अध्यक्ष केले. मी स्वभावत: अन्यायाविरूद्‌ध लढणारी, स्पष्ट बोलणारी, महिला मंडळाच्या नोंदणीसाठी कागदपत्रे पाठवली, परंतु पंचायत समितीचा क्लार्क बरेच दिवस झाले तरी नोंदणी क्रमांक देईना. आम्ही गेलो, प्रकल्पाची माणसे गेली, तरी काही काम होईना आणि तेव्हा काय होतं की तो क्रमांक मिळाला की प्रत्येक मंडळाला १०००/- रुपये अनुदान दिले जायचे.

शेवटी एक दिवस मी काही महिलांना घेऊन गेले व आम्ही क्लार्कवर चांगल्या खवळलो. शेवटी त्याने नंबर दिला. त्याला चहापाण्यासाठी ३० रू. द्यावे लागले बरं का ! पण सांगणार कुणाला? आता तुम्हाला म्हणून सांगते, महिला मंडळाच्या सभा नियमित पण वेळेवर होत होत्या ! असेच एक दीड वर्ष गेले आणि गावातल्या कार्यकर्तीने बचत गटाची माहिती सांगितली. आम्ही कोणीच पटकन 'हो' म्हटल नाही. एकतर आम्ही कमी शिकलेल्या, त्यातून पैशाचा व्यवहार ! नाही नीट जमला तर काय करायचं ! मनात अनेक शंका आणि कुशंका. कार्यकर्ते, अधिकारी यांनी ६-७ बैठका घेतल्या. गटाचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी त्यांनी संस्थेच्या कार्यकर्त्यांचाच बचत गट केलेला होता. त्यांचे अनुभव सांगितले. शेवटी अध्यक्ष मीच ना, ठरवलं की गट करायचाच. अथक प्रयत्नांनी आठ महिला कशाबशा तयार झाल्या व गटाला सुरुवात झाली.

त्याचबरोबर आम्हाला आरोग्याच्या विविध विषयांवर माहिती मिळायची आणि खरं सांगू संस्थेमध्ये अनेक देशी परदेशी लोक भेटी द्यायला यायचे तेव्हा मला व आमच्या गावातल्या स्त्रियांना आवर्जून बोलवले जायचे. त्यांची भाषा आम्हाला कळत नव्हती आणि आमची त्यांना. पण संस्थेतील लोक दोघांनाही समजावून सांगायचे. खूप वेळा असे पाहुणे आमच्या गावातही यायचे. ते कशासाठी आले असतील म्हणून आम्हालाही उत्सुकता असायची. अशा निरनिराळ्या संधी मिळाल्यामुळे मी चांगली सभाधीट झाले. १००-१००० महिलांमध्येही मी बोलू शकते.

तर तुम्हाला काय सांगत होते की आमचा गट तयार झाला. माझी परिस्थिती अगदी बेताची, पण दरमहा बचत मात्र न चुकता केली. तुम्हाला सांगते, आम्हा आठ महिलांनी गट सुरू केला ना तो दीड वर्षे जसाच्या तसा होता.

त्यामध्ये एकाचीही वाढ किंवा घट झाली नाही. गावातील लोकही साशंकच होते. आम्हाला काही कळत नाही, उगीचच पैसे गुंतविले असे ते म्हणायचे; पण आम्ही लक्ष दिले नाही, असे करता करता आम्ही कॅनरा बँकेत खाते उघडले. ते कळताच पुरुष मंडळी गटाकडे जरा जास्तच लक्ष घालू लागली. तेव्हा जी तरूण मुले होती त्यांचे एक भारूड मंडळ होते. सर्वच तरूण क्रियाशील. त्यांनी पण आम्हाला सुरूवातीला हिशोब ठेवायला मदत केली. आमचे बघून त्यांनी पण एक गट तयार केला आणि हळूहळू गावातील महिला गटाकडे आकर्षित व्हायला लागल्या. दीड वर्षा मध्ये एकही सभासद वाढला नव्हता. पण आता मात्र दोन निरनिराळे गट करण्याची वेळ आली. आमच्या गटांना ७२,०००/- रू. इतके कर्ज मिळाले. प्रत्येकीच्या वाटयाला २५००/- रू. आले. त्यातून आम्ही सर्वांनी प्रत्येकी एकेक शेळी घेतली. माझी घरची परिस्थिती अगदी बेताची, कष्ट

करु तेव्हाच खाऊ अशी स्थिती, शेळी घेतल्यावर थोडे फार दूध घरात येऊ लागले. शेळी, करडे यांची चांगली जोपासना केली व उत्पन्नात वाढ केली. कर्जाचा हप्ता तीन महिन्यातून एकदा भरावा लागे. पण आमच्यापैकी कोणीही हप्ता भरण्याची टाळाटाळ करत नव्हते. हफ्त्याची तारीख आणि रक्कम आधीच सांगितलेली असायची. त्यामुळे प्रत्येकजण तयारीतच असे. ते ७२,००० /- रूपयांचे कर्ज आम्ही तीन वर्षांमध्ये १२ हफ्त्यांमध्ये व्यवस्थित फेडले. मोठ्या झालेल्या शेळया विकल्या व एक गाय घेतली. गायीची जात चांगली लागली. ती दररोज १० लि. दूध देत असे. त्यामुळे कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ झाली. तिच्या दूधाचे बघा एकूण १२,००० /- रू. मिळाले. पहिल्या वेतात तिला गोऱ्हा झाला. तो विकून टाकला. दुसऱ्यावेळी कालवड झाली. त्यावेळी तिने १०,००० /- रू. यांचे दूध दिले.

मग आहे त्याच जागी पक्के घर बांधण्यासाठी मी कंबर कसली. गटाकडून ९,००० /- रू. कर्ज घेतले. बांधकामासाठी घरातल्या सर्वांनी कष्ट घेतले व एक कायमचे पक्के घर तयार झाले. मला आणि कुटुंबाला कायमची सावली मिळाली. प्रकल्पाचा उपक्रम म्हणून आम्हाला सुधारीत शेवग्याची (कोईमतूर) माहिती मिळाली. आमच्या गावात बऱ्याच जणांनी ती झाडे लावली. माझ्या अंगणात आजही तशी दोन झाडे आहेत आणि त्याला वर्षातून दोनदा भरपूर शेंगा येतात.

असाच काळ जात होता, दोनाचे चार, चाराचे आठ, आठाचे बारा असे गट वाढतच गेले. दोन गटाचे कामकाज मी बघत असे. बाकीच्या गटाचे काम गावातील इतर महिलांकडे सोपवले होते. दरम्यानच्या काळात केंदुरच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात मला सुईणीचे प्रशिक्षण देण्यात आले. माझ्या मनाची तयारी होतीच त्यामुळे प्रशिक्षणानंतर लगेचच मी बाळंतपणे करू लागले. तोही एक नवीन अनुभव मी घेत होते.

तरूण मंडळातील तरूण व महिला मंडळातील महिलांना गावडेवाडी हे आदर्श गाव बघायला नेले होते. ते बघून आल्यावर आम्हालाही आपल्या वस्तीसाठी काही करावेसे वाटू लागले. म्हणून शाळेच्या भोवती १०-१५ झाडे लावली व त्याची चांगली जोपासना केली, सात घरांजवळ शोषखड्डे केले, सार्वजनिक विहिरींचा परिसर वेळोवेळी स्वच्छ केला. शाळेपुढे खड्डा होता तो पूर्ण भरून काढला व तिथे ओटा बांधला.

●●

बिल्किस

किरकोळ अंगकाठीची पण देखणी, अशी ही बिल्किस, वयाच्या १६ व्या वर्षीच लग्न झाले. बिल्किसने डोळ्यात नवी स्वप्नं घेऊन संसारास सुरुवात केली; पण लवकरच तिला परिस्थितीची जाणीव होऊ लागली. नवऱ्यामध्ये फारसे कर्तृत्व नव्हते. कुटुंबापेक्षा निराळा, वेगळा असा कुठलाही व्यवसाय / कला त्याच्याकडे नव्हती. बांगड्या विकण्याच्या व्यवसायावरच सर्व कुटुंबाचा भार पेललेला होता. घरात खाणारी तोंडे अधिक आणि कमावणारी थोडी. शेतीसाठी थोडी जमीन होती, पण ती सगळी पावसावर अवलंबून. दुष्काळ तर पाचवीला पुजलेला. यातून काहीतरी मार्ग काढायलाच हवा होता. ती अन् तिचा नवरा गावापासून दूर २०-२५ कि. मी. च्या परिसरात हिंडून बांगडयांचा

व्यवसाय करू लागले. त्याचबरोबर इतर छोट्या मोठ्या वस्तूही ते विकू लागले.

अनेक गावातून विक्रीसाठी फिरल्यानंतर बिलिक्सच्या लक्षात आलं की गणेगावमध्ये आपले बस्तान बसू शकेल. गाव छोटं असलं तरी माणसं बरी आहेत. त्यांच्या नातेवाईकांनी दुसऱ्या गावांची नावे सुचवली. पण बिलिक्सने आपला निर्णय बदलला नाही आणि ते गणेगावात आले. अगदी छोटीशी खोली भाड्याने घेतली. परगावाहून पोट भरण्यासाठी आलेले कुटुंब म्हणून सुरुवातीला अवहेलनाच वाट्याला आली. एखाद्या छोट्याशा गावात परगावाहून येणे, तिथल्या माणसांना आपलेसे करणे व धंदा करून पोट भरणे वाटते तितके सोपे नाही. नोकरदार वर्ग जेव्हा कुठल्याही गावी जातो तेव्हा त्यांना वेगळाच मान मिळतो. त्यांच्या उपजिविकेचे साधन सर्वज्ञात असते. परंतु कुठलेच साधन हाती नसताना परक्या गावात स्थायिक होणे, निश्चितच अवघड असते. पण बिलिक्सच्या ठामपणामुळे, जिद्दीमुळे ते घडू शकले.

१९९५ साली ते या गावी आले तेव्हाच महिला आरोग्य व विकास प्रकल्पामार्फत गटांच्या कामाचा श्रीगणेशा होत होता. बिलिक्स सातवीपर्यंत शिकलेली होती. प्रशिक्षण कार्यक्रमांना ती आवर्जून उपस्थित राहिली. विविध उपक्रमात सहभागी झाली. बचतगटाची सर्व माहिती करून घेतली. घरातील परिस्थिती बिकट होती. कोणी आले तर चहा करावा असे तिला मनापासून वाटे; परंतु घरात कधी साखर नसे, तर कधी चहाची पावडर उपलब्ध नसे. अशा स्थितीत गटामध्ये दरमहा २५ रू. भरणे सुद्धा तिला अवघड होई. पण तिला गटाचे फायदे पूर्ण लक्षात आले होते. म्हणून ती गटामध्ये सामील झाली.

सुरुवातीला बांगड्यांचा व्यवसाय फारसा चालत नव्हता. चार जणांची पोटे भरणे तर गरजेचे होते. म्हणून तिने गोधड्या शिवायला सुरुवात केली. हंगामाप्रमाणे विविध वस्तूंची विक्रीही चालू केली. गावातले जुने धंदेवाले धंदा करू नको म्हणत, दम भरत, पण या दोघांनी त्यांची तमा बाळगली नाही. दागिने पटविण्याचे (गाठण्याचे) काम सुरू केले. गंठण गाठायला महिला येत तेव्हाच बांगड्याही भरून जात. धंद्यासाठी भांडवल मात्र प्रकल्पाच्या उपक्रमातून उपलब्ध झाले. सर्वात पहिले कर्ज मिळाले बिनव्याजी आणि रक्कम होती रू. २००० /- त्या कर्जाची फेड १००-१५० रू. महिन्याप्रमाणे केली तेव्हा पुढचे कर्ज मिळाले रू. २५००/-. त्यातून बांगड्याबरोबर इतर उपयोगी म्हणजेच टिकल्या, मेंदी कोन, चाप, पावडरचे डबे, असे साहित्य खरेदी केले. एकातून दुसरा, दुसऱ्यातून तिसरा असा तिने व्यवसाय वाढवित नेला.

मध्यंतरीच्या काळात बिल्किसने गावातील ग्रामसेवक, सरपंच, यांना भेटून दारिद्रय रेषेखालील कुटुंबामध्ये स्वतःच्या कुटुंबाचा समावेश करून घेतला व थोड्या दिवसातच ग्रामसेवकाच्या सांगण्यावरून बी.पी.एल.चा स्वतंत्र गटही स्थापन केला. त्या महिलांना शिकलेली बाई गट चालवायला हवीच होती. त्यामुळे त्यांनीही साथ दिली. त्यांच्या गटाला जे पहिले २५,००० /- रू. मिळाले त्यामुळे दहा जणींना प्रत्येकी २५०० /- रू. मिळाले. ते कर्ज तिमाही हप्त्यातून दोन वर्षात सर्वच महिलांनी फेडले. हिच्या व्यवसायाने चांगलाच जम बसविला. आता तिचे घरही भाड्याने घेतलेले पण मोठे आहे. २५,००० /- रू. फेडल्यामुळे त्यांच्या गटाला पुढचे रू. २, ५०, ०००/-चे कर्ज मिळाले. त्याचा

लाभ सभासदांना दोन टप्प्यात मिळाला. त्यातून तिने चप्पल विकण्यास सुरूवात केली. आज ते दोघे आपल्या कुटुंबासाठी महिन्याकाठी रू. २००० - २५०० सहज मिळवतात. गावात सगळेजण बघताहेत की कर्तृत्वान स्त्री स्वत:च्या कुटुंबाचा विकास कसा करू शकते. अर्थात हे सर्व करताना नवऱ्याने तिला पूर्ण सहकार्य केले. अडवणूक केली नाही हे तिचे नशीब. या दांपत्याला एक मुलगा व एक मुलगी आहे. मुलगा सहावीत तर मुलगी चौथीत शिकते आहे. दोन्ही मुले हुशार आहेत. आपली मुले खूप शिकावीत आणि व्यवसायाची खूप भरभराट व्हावी असे बिल्किसला मनापासून वाटते.

ज्या गावात येऊन आपला उत्कर्ष झाला, त्याचे ऋणही ती प्रसंगानुरूप फेडते आहे. अंगणवाडीमध्ये काही भांडी कमी पडत होती, ती गटातर्फे घेऊन दिली, कुकर नव्हता तर ग्रामस्थांच्या मागे लागून तो मिळवून दिला.

ढोल, लेझीम गावामध्ये उपलब्ध नव्हता, गटातर्फे त्याची खरेदी करण्यात आली व तो भाड्याने देण्यात येतो. काही महिलांना पैशाची अडचण आली तर वेळ ओळखून बिल्किस त्यांची गरज भागवते.

आता तिचा स्वत:चा आत्मविश्वास खूप वाढला आहे. कुठेही जाण्यास, बोलण्यास भिती वाटत नाही. भाषण सुद्धा करू शकते. एवढया शिदोरीवर ती भावी आयुष्याची वाटचाल यशस्वीपणे करू शकेल यात शंका नाही.

शासकीय योजनांचा तिने फायदा करून घेतला. भूमीहिन म्हणून ग्रामपंचायतीने तिला घर बांधण्यासाठी गावामध्येच जागा उपलब्ध करून दिली, तिथे तिने नुकतेच छोटेसे घर बांधले आहे.

सिंधू

कपाळावर कुंकवाचा मोठ्या आकाराचा ठसठशीत टिळा, नऊवारी पातळ साधंच. पण नीटनेटकं नेसलेलं, एक डोळा दृष्टीहीन, लोकांवर छाप पडावं असे दिसण्यात, पेहरावात विशेष असं काही नाही. पण चेहऱ्यावरचा आत्मविश्वास आणि खणखणीत बोलणं, ते मात्र निश्चितच प्रभावी. अशी ही सिंधूताई वय चाळीशीच्या थोडं पुढे. खेड्यातल्या सर्वसामान्य मुलींसारखंच हिंचही आयुष्य. वयाच्या पंधराव्या वर्षी लग्न झालं आणि व्यंग असल्यामुळे दुसरेपणावर दिली गेली. जन्मभर उपेक्षाच वाट्याला आली. नवऱ्याला चांगली नोकरी होती. परंतु नवऱ्याने व सवतीने बिनकष्टाचे आयुष्य तिला जगू दिले नाही. तिने दुसऱ्याच्या गोठ्यावर दिवसभर राबायचे आणि पैसे मिळाले की त्यावर हक्क मात्र सवतीचा. हाणमार तर रोजचीच. हिच्या लग्नानंतर सवतीला चार मुले झाली आणि हिला एक. हिला स्वत:लाच कुटुंबातील एक व्यक्ती कोणीही सहभागी करत नव्हते. त्यामुळे मुलीला चांगले वागवतील अशी आशा करण्यात अर्थ नव्हता. स्वत:वर झालेला अन्याय सिंधूने सहन केला. पण मुलीच्या मायेने तिला नवऱ्यापासून वेगळे केले. सिंधूने मुलीला शाळेत घातले. काबाडकष्ट करून आणि विविध संस्थांची मदत घेऊन मुलीला १० वी पर्यंत शिकविले.

९६ साली करंदी गावामध्ये बचत गटाची चळवळ सुरू झाली. आसपासच्या बायकांकडून सिंधूलाही ते कळले. पण आपण गरीब, नियमित पैसे भरणे जमेल किंवा नाही म्हणून जरा साशंक होती. पण हळूहळू धीर करून ती गटाची सभासद झाली. त्यावेळी मुलगी होती सहावी सातवीत. गटात

आल्यामुळे तिला संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती मिळू लागली. त्यातूनच मुलीसाठी शैक्षणिक मदतही मिळाली व तिचा एक भार हलका झाला. मुलगी पण कधी नापास झाली नाही. म्हणता म्हणता तिने दहावी पूर्ण केली. सिंधूला कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. आपल्याला घरच्या परिस्थितीमुळे दुसरीतच शाळा सोडावी लागल्याचे शल्य तिच्या मनात होते. त्याचे थोडेसे निराकरण झाले असेच तिला वाटले. त्यापुढे मात्र मुलीला शिकविणे तिला शक्य झाले नाही. प्रकल्पातर्फे तिला शेळी घेण्यासाठी बिगरव्याजी कर्ज मिळाले. तिने शेळी घेतली. तिचे संगोपण केले त्यामुळे उत्पन्नात वाढ झाली.

मुलीला १८ वे वर्ष लागल्यावर तिने तिचे लग्न करून दिले. लग्नामध्ये हिच्या नवऱ्याने, सवतीने कोणतीही मदत केली नाही. बचत गटातून तिने १०,००० रू. कर्ज घेतले, आसपासच्या लोकांनी थोडी मदत केली आणि लग्न पार पडले. गटाचे कर्ज नियमित फेडते आहे.

आता मुलगी आपल्या घरी सुखात आहे. तिला नुकतीच मुलगीही झाली आहे. तिला कोणी ना कोणी हटकते, तू नवऱ्याकडे काही पैसा अडका का मागत नाहीस? ती म्हणते, माझ्यावर मुलीची जबाबदारी होती पण तिचे सगळे व्यवस्थित झालं आता मला भांडण करून काही मिळवायचे नाही. आता कोणी म्हणेल यामध्ये सिंधूने विशेष असं काय केलं. तुम्ही मला सांगा, सिंधूसारख्या स्त्रियांची स्वप्नंही छोटीच, आयुष्याकडून अपेक्षा तरी काय असणार. मुलांचे नीट मार्गी लागावे व स्वतःला सुखाने चार घास, खाता यावे, एवढीच अपेक्षा, सिंधूला यातच समाधान वाटते.

पण सिंधूबद्दल एवढेच सांगून थांबता येत नाही. आयुष्याच्या धकाधकीत तिने प्रकल्पातर्फे आयोजित केलेले एकही शिबिर, प्रशिक्षण सोडले नाही. प्रत्येक ठिकाणी उत्साहाने सहभागी झाली व अजूनही होते आहे आणि इतरांना प्रवृत्त करते आहे. स्वतः मध्ये आलेला आत्मविश्वास दुसऱ्यांमध्येही यावा यासाठी धडधडते आहे. सिंधूबाई नेहमी खरे तेच बोलते. आत एक बाहेर एक असा तिचा स्वभाव नाही. शेजारी पाजारी, गावामध्ये काही भांडणे झाली तर हिला बोलवतात. हिच्या धाकामुळे भांडणे मिटतात. दारूड्यांना सुद्धा ही टोकल्याशिवाय राहात नाही. गटामध्ये काही गैरव्यवहार होतो आहे असे दिसले की ही जाब विचारते व सर्व व्यवहार सुरळीत कसे होतील ते पाहते.

अशा स्त्रियांना नेमके नाव काय द्यायचे ते इतरांनी ठरवावे; पण माझ्या मते ह्याच उद्याच्या आशेचे किरण आहेत. त्यांच्यामध्ये जाणीव-जागृती झालेली आहे. त्यांच्यामध्ये कुटुंब, बचतगट इत्यादी वर नियंत्रण ठेवण्याचे सामर्थ्य आहे. त्या सामर्थ्याचा उपयोग दुसऱ्यांना प्रेरीत करण्यासाठी सतत होतो आहे. आज समाजात काम करताना अशाच स्वयंप्रेरित लोकांची अधिक गरज भासते, नाही का?

••

संस्था-वृत्त

स्त्री कार्यकर्त्यांचे अंतरंग

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद (महाराष्ट्र असोसिएशन ऑफ एन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) ची स्थापना पुणे विद्यापीठात नोव्हेंबर १९७५ मधील महाराष्ट्रातील सामाजिक विज्ञान प्राध्यापकांच्या चर्चासत्राच्यावेळी झाली. त्याचे पंजीकरण मे १९७६ मध्ये झाले. परिषदेच्या व्यासपीठावर प्रामुख्याने आदिवासीविषयक समस्यांचा विचार करण्यात येत असे. डिसेंबर १९७८ मधील वैद्यक मानवशास्त्राच्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रास डॉ. बानूबाई व इतरांनी मदत केल्यामुळे खर्चाची बचत झाली. या बचतीचा उपयोग 'हाकारा' त्रैमासिक काढण्यास करावा, असे परिषदेचे अध्यक्ष प्रा. गं. बा. सरदार यांच्या सल्ल्याने ठरले.

१ जानेवारी १९८० रोजी हाकाराचा पहिला अंक केळकर म्युझियमचे श्री. दिनकर (काका) केळकर यांच्या हस्ते टिळक स्मारक मंदिरात प्रकाशित झाला. परिषदेच्या व हाकाराच्या माध्यमातून स्त्री कार्यकर्त्यांना एक व्यासपीठ निर्माण झाले.

परिषदेच्या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने मे २००१ मध्ये 'आदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणि विकास' या विषयावर एक राज्यव्यापी संमेलन भरविण्यात आले होते. यांत खालील विषयांवर चर्चासत्रे आयोजित करण्यात आली.

१. आदिवासी आणि अस्मिता
२. आदिवासी आणि आरोग्य
३. भटक्या व विमुक्त समाजांचे प्रश्न
४. आदिवासी स्त्री
५. जमीन वन आणि संरक्षित क्षेत्रांचे प्रश्न
६. वंचित समूहांचे शिक्षण

आदिवासी समाज व संस्कृती याबरोबरच जातीनिष्ठ ग्रामीण समाज व संस्कृतीचाही ऊहापोह हाकारात व्हावा आणि परिषदेने त्याबाबतचे कार्यक्रम आखावे, अशा मागण्या कार्यकर्त्यांकडून सतत होत राहिल्या. परिषदेने वैद्यक मानवशास्त्राच्या अनुभूतीतून आरोग्य व रोग नियंत्रणाच्या विषयात संशोधन व प्रशिक्षण केले. त्यानिमित्ताने के.ई.एम. हॉस्पिटल संशोधन केंद्र, बी.जे वैद्यकीय महाविद्यालय, सैनिकी वैद्यकीय महाविद्यालय आणि कुष्ठरोगासंबंधी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांशी परिषदेचा जवळचा संबंध प्रस्थापित झाला.

त्याच्या परिणामस्वरुप १९९९ साली वेल्हे तालुक्यातील प्रजनन व बाल आरोग्यसंबंधी एक प्रकल्प परिषदेस ५ वर्षांच्या कालावधीसाठी मिळाला. गावातील स्त्री स्वयंसेवकांच्या माध्यमातून या प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले. या प्रकल्पात काम करणाऱ्या स्वयंसेवकांचे अंतरंग हाकाराच्या एप्रिल-जून २००० च्या अंकात देण्यात आलेले आहेत. अलिकडील दोन कथनं या अंकातही देत आहोत.

भारतात पथप्रदर्शक ठरणाऱ्या तीन संस्था १९७५ च्या आसपास महाराष्ट्रात निर्माण झाल्या.
डॉ. बानू कोयाजी यांच्या के.ई.एम. हॉस्पिटल संशोधन केंद्राच्या व्यतिरिक्त डॉ. नौशिर आंटिया यांची सामाजिक आरोग्य संशोधन संस्था(एफ.आर.सी.एच.) व डॉ. रजनीकांत आरोळे यांचा ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड याचा प्रामुख्याने उल्लेख करावयास हवा. या तिन्ही संस्था तज्ज्ञ डॉक्टरांनी ग्रामीण भागातील लोकांना उत्तम उपचार करण्यासाठी काढल्या; परंतु त्यांना लगेचच लक्षात आले की आरोग्य उपचाराने सुधारत नाही, तर आर्थिक व

सामाजिक विकास झाल्याशिवाय चांगले आरोग्य समाजास प्राप्त होऊ शकत नाही.

विशेषत: स्त्रियांचे आरोग्य ही पितृप्रधान सामाजातील एक जटील समस्या आहे. या तिन्ही प्रकल्पात स्त्रीला केंद्रबिंदू मानून स्त्री-स्वयंसेवकांच्या माध्यमातून आरोग्य व विकासाचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न यशस्वीपणे झालेले आहेत. या सर्व प्रयत्नात लोकांचे आरोग्य व आरोग्य दृष्टी ही तर सुधारली आहेच; पण त्यापेक्षा महत्त्वाचे, ग्रामीण भागातील ज्या स्त्रिया गरीब, होरपळलेल्या, विधवा व परित्यक्ता आहेत त्यांनी प्रकल्पात स्वयंसेवकाचे काम केल्याने त्यांचा स्वत:चा विकास झाला. त्यांना आत्मसन्मान व आत्मविश्वास प्राप्त झाला आणि कालांतराने त्यांना समाजातही मान-मान्यता प्राप्त झाली. डॉ. आरोळे यांच्या प्रकल्पातील ज्येष्ठ स्त्री-स्वयंसेवक कार्यकर्त्यांच्या हृदयद्रावक कहाण्या **मुक्ता** या ग्रामीण आरोग्य प्रकल्प प्रकाशनात नोंदविल्या आहेत. या सर्व २२ महिला हयात आहेत व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आरोग्य प्रशिक्षणाचे कार्य जोमाने करीत आहेत.

स्त्री-कार्यकर्त्यांच्या माध्यमातून ज्या ज्या संस्थांनी लोकांचे आरोग्य सुधारण्याचे प्रयत्न केले ते सर्व यशस्वी झालेत, हेच यातून अनुभवास येते.

◆

‘आयुष्याला नवीन वळण मिळालं’

सौ.शकुंतला संजय वाडकर - दापोडे

मी नेहमी माझ्या मैत्रिणीबरोबर मिटिंगच्या दिवशी जायचे आणि त्यांचे ते सर्व पाहून मला वाटायचं, की मला पण ह्या म. मा. वि. परिषद या संस्थेत काम करायला घेतलं तर बरं होईल. त्या मैत्रिणीने शिल्पाताईंना सांगितले की माझ्या मैत्रिणीला आपल्या संस्थेत काम करायचं आहे, तर तिला घ्या. तेव्हा त्यांनी मला पहिल्यांदाच मालवली गावाचा सर्वे करायला बोलावलं आणि मी जायला लागले. मी सर्वेचे फॉर्म भरले ते त्यांना आवडले. तेव्हा विदुलाताई व भूपालीताई होत्या.

त्यांनाही माझे काम आवडले आणि त्यांनी मला या संस्थेत कामाला घेतले. मग मी माझ्या मैत्रिणी बरोबर गावोगावी आरोग्याची माहिती घ्यायला जावू लागले. मग तर मला खूपच आवडायला लागले. कारण नवीन माणसांच्या ओळखी व्हायला लागल्या आणि अगदी जवळची गावे असूनही कधी तिथे जाता आले नाही पण संस्थेत काम करायला लागले आणि महिन्यातून तीन ते चार वेळा जायला लागले. जरा बरं वाटायला लागले कारण असं घराच्या बाहेर पडायचं स्वातंत्र्य मिळायला लागलं नाहीतर कुठेही जाता येत नव्हतं आणि कुणाच्याही ओळखी नव्हत्या. स्वत:च्या शरीराची स्वच्छता कशी ठेवायची तेही माहित नव्हते, तेही सर्व माहीत झाले आणि विशेष म्हणजे गावात आमच्या दोघींची नावेही बदलली आणि ‘आरोग्य मार्गदर्शक’ असे नाव पडले. गावातल्या लोकांनाही माहिती मिळू लागली. कुणालाही जरासा काय त्रास होऊ लागला की आम्हाला विचारायचे. मग आम्ही त्यांना सांगायचे की आमच्या संस्थेत शिबिर आहे, तिथे तुम्ही या; नाही तर डॉक्टर कडे जा असा सल्ला देत राहिलो.

नंतर दुसरी एक संस्था आली ‘पपेट’ तिच्यात आम्ही काम करू लागलो. मग जास्तच गावागावात फिरायला लागलो, ‘पपेट’ मध्ये बाहुली नाट्य करून आम्ही लोकांना आरोग्याची माहिती देऊ लागलो आणि आता सुद्धा आम्हाला असं वाटत की या संस्थेची किती कामे करावी. असं सगळं आमचं जीवन बदलून गेलं. माझ्यातरी आयुष्याला एक नवीन वळण मिळालं. नाहीतर आम्ही साक्षर असूनही आज निरक्षरच राहिलो असतो. म्हणून मी संस्थेतल्या सर्व लोकांची आभारी आहे.

◆

'या कामामुळेच अंगणवाडीचं काम मिळालं.'

उमा ढवळे, दापोडे

माझा अनुभव खूप गमतीशीर आहे . कारण कामाची सुरुवातच अशी झाली की त्या कामात शिक्षणाची अट नाही किंवा कसली परीक्षा सुद्धा नाही. माझ्या कामाची सुरुवात म्हणजे की फक्त बोलणारी व्यक्ती व लग्न झालेली ह्या दोन अटी होत्या.

एके दिवशी आमच्या ह्या छोटयाशा दापोडे गावात तीन महान व्यक्ती आल्या. त्यात आमचे सर्वात मोठे सर म्हणजे मुटाटकर सर. त्यांच्याबरोबर आगाशे सर व आमच्या खूप खूप छान बोलणाऱ्या व समजूदार अशा आमच्या शिल्पाताई. त्यांनी आमच्या मंदिरात मोठी मिटिंग घेतली. गावातील लोकांशी बोलूणी केली. बोलणी केली म्हणजे घरात बसून, एक रात्र राहून.

त्यांनी गावकऱ्यांना सांगितले की 'आम्हाला एक स्त्री व एक पुरूष काम करण्यासाठी पाहिजे आहे व स्त्री चांगली बोलणारी व लग्न झालेली पाहिजे' आणि त्याच मिटींगमध्ये माझ्या गावातील लोकांनी माझं नाव त्यांना सांगितलं. महत्वाचं म्हणजे की नेमकी त्याचदिवशी गावात नव्हते. पुण्याला गेले होते. म्हणजे मी नसताना हे सगळं झालं आणि मग दोन दिवसांनी मी पुण्यावरून आल्यावर प्रत्येकजण म्हणू लागले की 'तुला काम आले. तुला नोकरी लागणार आहे.' पण मीच उलट त्यांना म्हणायचे, ' छे कामं एवढी काय रस्त्यावर पडली आहेत का, तेव्हा मला काम अगदी गावात विचारत यायला.' माझी आई सुद्धा अशी लोकं आली होती व गावकऱ्यांच्या मिटींग मध्ये कामाचं ठरवले आहे असं म्हणाली, तेव्हा मी आईला म्हटलं 'अग कसं शक्य आहे !'

मग दुसऱ्या दिवशी एक व्यक्ती माझ्याकडे आली. ते सरळ आमच्या घरीच आले आणि आल्यावर त्यांनी मलाच विचारले की, 'इथे उमाताई कुठे राहतात' मग 'का ? मीच आहे उमा, का काही काम आहे का?' हो, मग मी बसायला सांगितले आणि त्यांनी त्यांचं नाव मला सांगितलं. ते मि. सावंत होते. त्यांनी मला कामाचे स्वरूप सांगितले. ते म्हटले की, आरोग्य जाणीव-जागृती करण्यासाठी आम्हाला एक स्त्री पाहिजे होती. त्या मध्ये तुमच्या गावकऱ्यांनी तुमचे नाव सांगितले आहे, तेव्हा मी तुमच्याकडे आलो आहे. हे ऐकून मला क्षणभर काही सुचलं नाही. मग त्यांनी मला मिटींगला येण्यास सांगितले.

आमच्या इथेच वेल्हा पंचायत ऑफिसमध्ये लागोपाठ तीन मिटींगा होत्या. तिथे आम्ही गेल्यावर हे सगळे लोक म्हणजे आमच्या मोठे सर , मोठ्या मॅडम, आगाशे सर व शिल्पा ताई आणि आम्ही चौदा गावातले सर्व लोक जमा झाले होतो. आमची प्रथम सर्वांशी ओळख झाली. त्यांनी सर्व कामा विषयी माहिती दिली, पण आम्हाला सर्वांना खूप खूप लाज वाटत होती. त्या कामांबद्दल सगळे म्हणू लागले की 'छे आम्ही नाही करणार असलं काम' पण आमच्या मॅडम व शिल्पाताई यांनी समजून सांगितले. ' काही नाही यामध्ये लाजण्या सारखं 'आणि त्यांनी काम समजून सांगितले. तेव्हा कुठे कामाची हळूहळू सुरुवात झाली.

सुरुवातीच्या तीन मिटींग झाल्यावर दर महिन्याला एक मिटींग घेऊन ते आम्हाला काम शिकवत राहिले आणि मी सुद्धा कामाला लागले. मग आम्हाला

प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या गावात सर्वे करण्यास सांगितले. तो सर्वे करताना खूप अडचणी आल्या. कोणी माहिती सांगतच नव्हते, तर कोणी काय म्हणायचे, 'डॉक्टरीन पडली तुला काय कळतंय' असं म्हणत. पण तरी सुद्धा आम्ही काम करत राहिलो.

एक मात्र झाले, त्या निमित्ताने गावातील प्रत्येक घरात जाण्याचा योग आला आणि मला माहिती झालं की कोण कुठे राहतं ते. याच्या आधी कोण कुठे राहते अजिबात माहीत नव्हते. कोणी मला एवढे ओळखत नव्हते, पण सर्वेमुळे गावातील लोकं मला ओळखू लागले आणि मलाही खूप बरं वाटू लागलं. खरंतर मी, माझे मिस्टर गेले १९९१ साली, तेव्हापासून अजिबात घराबाहेर पडले नव्हते. जाणं-येणं होतं, पण अगदी कमी. ह्या कामामुळे मला सारखे बाहेर पडता आले. हजार संकटे यायची. त्याच्याशी का बोलली, असं म्हणत. पण हे काम सुरू झाल्यावर प्रत्येकाशी बोलल्याशिवाय काम नाही, असं झालं आणि त्याच्यामुळे मी खूप धीट झाले. माझ्या घरच्या लोकांनी आई-वडील, भाऊ यांनी खूप साथ दिली.

आमच्या कामात अजून बऱ्याच लोकांच्या ओळखी झाल्या. नंतर काही दिवसांनी अभय दादा आले. ते प्रत्येक काम अगदी प्रेमाने समजून सांगत असत. मग प्रत्येक गावात जाऊन सर्वे केला. त्यामुळे आजुबाजूच्या गावातील नातेवाईक माहीत झाले. नाहीतर याच्या आधी कोण कोठे राहत होते हे अजिबात माहीत नव्हते. ह्या कामात एवढे रंगून गेलो होतो, कारण यामध्ये सगळी आरोग्यविषयी माहिती होती. म्हणजे डॉक्टरपेक्षा भारी होतं हे सगळं. **हे काम इतकं लकी ठरलं की हे करता करता मला अंगणवाडीचे काम आले.** मग आणखीच दुधात साखर पडली आणि आणखी काम वाढले.

या कामामुळे आजारांची, औषधांची चांगली माहिती झाली आणि नंतर थोड्यात दिवसात शिल्पाताई आम्हाला सोडून परदेशात त्यांच्या मिस्टरांबरोबर निघून गेल्या. परत आम्ही सर्वांनी कामाची आशा सोडून दिली. मग म्हटलं आता कसं काम करायचं. आम्ही प्रत्येकाने ठरवले की आता काम करायचे नाही. पण असे झाले नाही. त्यांच्यानंतर आल्या विदुलाताई व भूपालीताई. या दोघींनी आम्हाला पुन्हा कामाची दिशा दाखवली. त्यांनी समजाविल्यानंतर आम्ही सर्वजण पुन्हा कामाला लागलो. आम्ही सर्वांनी एकत्र मिळून चौदा गावात सर्वे केला.

थोड्या दिवसांनी मि. कानिटकर यांनी आम्हाला कठपुतळी बाहुल्यांचे खेळ शिकवले. आम्ही सर्वांनी चौदा गावांत जाऊन रात्रीचे कार्यक्रम घेतले. आणि महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक गावात लोकांनी खूप खूप चांगला प्रतिसाद दिला. अगदी भर पावसाळ्यात आम्ही कार्यक्रम केले. पण कोणीही आमचा राग नाही केला. कारण पावसाळा म्हणजे वेल्हे तालुक्यातील महत्त्वाचा ऋतू आहे. पावसाळ्यात खरं काम चालू असते, भात लावणी. आणि एवढं असून सुद्धा आमच्या कार्यक्रमाला खूप छान साथ द्यायचे, खूप आनंदात कार्यक्रम बघायचे. हे आमच्या कामाचा महत्त्वाचा वाटा आहे, की लोकांचा प्रतिसाद असणे.

नंतर शाहीर चौधरीसर यांनी आम्हाला आरोग्याविषयी गाणी शिकवली आणि ती आम्ही सुद्धा आमच्या प्रत्येक गावात म्हणून दाखवली व आरोग्याविषयी संदेश गावागावात पोचवले. आम्ही आता सर्व मिळून प्रत्येक गावात मिटींग घेतो. या कामामुळे गावातील लोक आता आम्हाला ओळखत आहेत. प्रत्येक गावातून मला आधार मिळतो. प्रत्येक गावातील लोक खूप प्रेमाने बोलतात. आम्ही प्रत्येक

गावात किशोरी मुली व बायकांच्या मिटींग घेतो व ती लोकं चांगली साथ देतात.

आमच्या संस्थेतर्फे खूप शिबीरे झाली. किशोरी मुलींची व अंगावरून जाणाऱ्या बायकांची. यामध्ये आमच्या लोकांनी त्यात विनामुल्य तपासणी व औषध ठेवली होती. किशोरवयीन मुलींना रक्त तपासणी व कुठला गट कसा असतो ते सांगितले. संस्थेचे ठिकाण व चौदा गावं बघायला मिळाली. नंतर शिल्पाताईंनी व अभय सरांनी मुक्तांगणला नेले. त्यांच्यानंतर मुनोत सभागृहात नेले. तिथे सुद्धा बऱ्याच गावच्या संस्थेची लोकं आली होती. नंतर आम्ही हे काम करता करता रात्री गाण्याच्या भेंड्या सुद्धा लावल्या होत्या. या कामामुळे माझी स्वत:ची खूप प्रगती झाली. मला तालुक्यातील बरेचलोक ओळखू लागले आणि मी लोकांना ओळखू लागले. सर्वात महत्वाचं म्हणजे आरोग्यविषयी माहिती झाली. ही दोन्ही कामे एकत्र असल्यामुळे तर अजून लोकांची चांगली साथ मिळाली. माझं काम बघून सगळे लोकं माझ्यावर खूश होते. सरकारी दवाखान्यात सिस्टर, डॉक्टर सगळे अगदी काही साथीच्या आजाराची औषधं माझ्याकडे अगदी विश्वासाने ठेवायला द्यायचे. मी ही जबाबदारी अगदी व्यवस्थितपणे पार पाडली.

हे काम मला शक्य झाले संस्थेतील लोकांमुळे व गावकऱ्यांमुळे. यांनी जर साथ दिली नसती तर हे काम झाले नसते. मला एवढंच वाटतं की स्वत: उपस्थित नसतानाही माझ्या गावकऱ्यांनी माझे नाव सुचविले. त्यासाठी मी अंत:करणापासून त्यांचे आभार मानते. मी जिवंत असेपर्यंत मी जिथे जाईन तिथे हे ज्ञान उपयोगी येणार आहे आणि त्याचा फायदा दुसऱ्यांना होणार आहे. हेच माझ्या कष्टाचे फळ आहे. हे काम करायला लागल्या पासून खूप मान मिळू लागला. माझ्या घरातील लोकांनी खूप साथ दिली. मिटींगला वगैरे जायचं म्हटलं तरी कोणी अडविले नाही. अगदी आनंदाने पाठवत होते.

माझी मैत्रिण शकुंतला, ती आल्यापासून आणखीच कामात भर पडली. कारण आम्ही दोघी मिटींगला गेलो व उशीर झाला तर काही वाटत नव्हते. रात्रीच्या कार्यक्रमाला सुद्धा दोघी असल्यावर कुठेही जायला भीती वाटत नव्हती. आम्ही जे काम करायचो ते दोघी मिळून करायचो त्यामुळे खूप आनंद वाटत असे. घरच्या लोकांनी सुध्दा कोणत्याही कार्यक्रमाला जायला अडविले नाही. त्यांचे सुद्धा मी खूप आभार मानते. तसं कितीही केले तर आमचा हा ग्रामीण भाग.

इथे आम्हाला खूप लोकांना तोंड द्यावे लागले. आम्ही जेव्हा कठपुतळी बाहुल्यांचा खेळ करत होतो तेव्हा काही लोक चर्चा सुद्धा करत असे, आम्ही दोघी निघालो की चर्चा करायचे, की कुठे या पारी जातात, पण आम्हाला विचारले, आम्ही त्यांना व्यवस्थित समजून सांगायचो. आम्ही काही शाळा कॉलेजात सुद्धा कार्यक्रम केले, पण आम्हाला सगळीकडे खूप चांगला प्रतिसाद मिळाला. हे सगळं मुटाटकर सर, मॅडम, आगाशे सर, अभय सर, शिल्पाताई, विदुलाताई व भुपाली ताई यांच्या मार्गदर्शनामुळे शक्य झाले. त्यासाठी मी या सर्वांची खूप खूप आभारी आहे.

एक महत्त्वाचं राहिलं शिल्पाताईंनी आम्हाला राळेगण सिद्धी दाखवले. ते पाहून तर खूप आनंद झाला. कारण ते मला आयुष्यात कधी बघायला मिळालं नसतं. मला राळेगण सिद्धी खूप खूप आवडले. वेल्ह्यातील काका, निर्मलाताई, पार्वती ताई व माझी गावातील साथीदार शकुंतला ह्या सर्वांची मी आभारी आहे.

●●

हाकारा अंक सूची

१९८० - १. जबरन जोत जंगल जमीन २. आदिवासी व शिक्षण
३. आदिवासी वनसंवर्धन ४.आदिवासी साहित्य व कला
१९८१ - १. दलितांना सवलती व राखीव जागा
२. आदिवासी व आरोग्य ३. वनशेती व संवर्धन
४. रोजगार हमी योजना
१९८२- १. धरणे व विकास २. धरणे व विकास
३-४. जंगल व्यवस्थापन
१९८३ - १. आदिवासी व दारु
२. आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
३. प्रा. सरदार गौरव अंक
४. आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न
१९८४ - १-२. आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
३. आदिवासी स्त्री ४. आदिवासी आरोग्य व शिक्षण
१९८५ - १. आदिवासी संघटन २. जमीन हस्तांतर
३. आदिवासी महिला ४. आदिवासी व सरकार
१९८६ - १. जंगल व धरण २. आदिवासी कला
३. आदिवासी व वेठबिगारी
४. आदिवासीविषयक ग्रंथ : मानवशास्त्र परिचय
१९८७ - १. भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
२. आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
३-४. राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न
१९८८ - १. सवलती अपहरणाची समस्या
२. आदिवासी साहित्य
३-४.आदिवासी समाज व संस्कृती
१९८९ - १-२. डॉ. वेरीअर एल्विन विशेषांक
३-४. व्यवसाय मार्गदर्शन
१९९० - १-२. महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
३. जागतिक आदिवासी
४. गं.बा. सरदार स्मृति विशेषांक
१९९१ - १. आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
२. आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
३. आदिवासी जीवन व संस्कृती
१९९२ - १-२. आदिवासी समाज जीवन
३-४. अनुताई वाघ विशेषांक
१९९३ - १-२. आदिवासी धर्म, सण व उत्सव
३-४. धरण-विस्थापन व पुनर्वसन
१९९४ - १. आदिवासी संस्कृति
२. आदिवासी एकता परिषद
३. आदिवासी विकासाची सैध्दान्तिक भूमिका
४. आदिवासी जमाती
१९९५ - १-२. राणीपूर अभ्यास विशेषांक
३. कुपोषण विशेषांक ४. पर्यावरण विशेषांक
१९९६ - १. आदिवासी जमाती
२. महाराष्ट्र, ओरिसा आदिवासी अध्ययन
३. आदिवासी जमाती ४. आदिवासी शिक्षण
१९९७ - १-२. वारली लोकगीते व बोलीभाषा
३. पंचायत राज विशेषांक
४. साहित्य संमेलन विशेषांक
१९९८ - १. वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक
२. आदिवासी व प्रशासन
३-४. आदिवासी समाज व संस्कृती
१९९९ - १. आदिवासी व आर्थिक धोरण
२. आदिवासी विकास व संस्कृती
३-४. बोर्डी परिसर अभ्यास
२००० - १. आदिवासी जीवन, कला व मराठी साहित्य
२. स्त्रिया आणि आरोग्य
३. पाणी टंचाई आणि पाणलोट विकास
४. आदिवासी जीवन व संस्कृती
२००१ - १-२. अस्मिता व विकास विशेषांक
३. आदिवासी समाज व शासन
४. अस्मिता व विकास : दिशा २००१
२००२ - १. आदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणि विकास
२-३. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प - महाराष्ट्र
४. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प - पर्यायी उपाययोजना
२००३ - १-२. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : मध्यप्रदेश
३. आदिवासी समाज ४. आदिवासी संस्कृति
२००४ - १. पुस्तक परिचय
२. आदिवासी विकासाची वाटचाल
३-४. आदिवासी विकास धोरण

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

वेल्हे तालुक्यातील आरोग्य मार्गदर्शक पर्यवेक्षक.

मा. तहसीलदार, वेल्हे यांच्या हस्ते आरोग्य मार्गदर्शिकांचा जाहीर सत्कार.

मोनार्क प्रिंट आर्टस, पुणे. फोन : (०२०) २४४८ ८४४२